# कोकणचा विकास की विनाश?

## डॉ. सुलभा ब्रह्मे

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय

# कोकणचा विकास की विनाश?

## ! ! जमीन अमुच्या रक्ताची, नाही कुणाच्या बापाची ! !

* १९९४ पासून आपल्या निर्वाहहक्कासाठी बोरभाटले–कातळवाडी–अंजनवेल –बेलदूर–रानवी मधले स्त्री–पुरुष, उचापती एन्रॉन कंपनी आणि दंडेल राज्यकर्ते यांच्या सक्तीच्या जमीन संपादनाविरोधात आणि देशविघातक एन्रॉन वीज प्रकल्पाविरोधात सात वर्षे प्राणपणाने लढले.

* प्रश्न फक्त एन्रॉनचा नाही, साऱ्या कोकणपट्टीतच परकीय कंपन्यांची आणि बडया देशी कंपन्याची सुभेदारी भारतीय राज्यकर्ते निर्माण करीत आहेत.

* दिघी, दाभोळ, रेवस, जयगड, जैतापूर, विजगदुर्ग, रेडी–एक ना दोन ४८ महत्वाची बंदरे, विस्तीर्ण नितळ समुद्रकिनारे, नारळ, सुपारी, आंबा, फणसाच्या बागा आणि कोळंबी, बांगडा, तारली, सुरमई अशी सागरीसंपत्ती उध्वस्त करून, शेतकरी–मच्छीमार श्रमिकांना तडीपार करून बडया कंपन्यांशी हातमिळवणी करण्याची गद्दारी 'मराठी' राज्यकर्ते करीत आहेत.

* या गद्दारी विरोधात, आपली भूमी, आपली जीवनसाधने, आपली अस्मिता आणि आपली संस्कृती वाचवण्यासाठी कोकणची श्रमिक जनता लढते आहे. भारतभूमीची विक्री थोपवून आपली निसर्गसंपदा जोपासून लोककेंद्री समुचित विकास साधण्याचे आव्हान श्रमिक जनतेने स्वीकारले आहे. 'पैसा घेणार भिकारी' या कातळवाडी–बोरभाटलेच्या स्त्रियांच्या एका घोषवाक्यातच त्यांच्या जीवनाची मूल्ये स्पष्ट होतात. प्रश्न आहे की पैशाच्या विषारी धुराने इथले आकाश, इथला समुद्र काळवंडणार, इथली जनता भस्मसात होणार की कोकणच्या निसर्गसंपन्न मातीत यापुढेही कविता फुलत राहाणार?

* प्रत्येक स्वाभिमानी मराठी माणसाने हा प्रश्न विचारणे गरजेचे आहे. सुबुध्द मराठी माणूस लोकाभिमुख विकासाच्या बाजूनेच उभा राहील अशा विश्वासाने 'कोकणचा विकास की विनाश?' या पुस्तिकेमध्ये विनाशकारी शासकीय धोरणाचा उहापोह केला आहे आणि फळाफुलांनी बहरलेला, वृक्षराजीने नटलेला, निळ्याशार समुद्र किनारपट्टीचे वैभव

सांभाळणारा, समृध्द, सुसंस्कृत, सभ्य जीवन फुलवणारा चिरंजीवी विकास कसा साधता येईल याची सूत्ररूपाने मांडणी केली आहे.

## मनोगत

आम्ही मूळचे कोकणवासी. वडिलांचे (धनंजयराव गाडगीळ) आजोबा १८५७ साली सावंतवाडी संस्थनातले मांजरे गाव सोडून नागपूरला स्थलांतरित झाले. कोकणशी जिव्हाळ्याचे संबंध आले ते १९९४ साली एन्रॉनविरोधी लढयात सामील झाल्यावर. कोकण, महाराष्ट्राचे काश्मीर ! ते वाचवण्याच्या लढयात अखिल महाराष्ट्राच्या जनतेने सहभागी होण्यासाठी राज्यकर्ते कोकणावर करीत असलेले पाशवी हल्ले व त्या विरोधात जनता उभे करीत असलेले झुंजार लढे आणि कोकणच्या विकासाचे लोककेंद्री पर्याय वाचकांपुढे ठेवण्यासाठी ही पुस्तिका.

ऋणनिर्देश : कातळवाडी, बोरभाटले, अंजनवेल, वेलदूर, रानवी येथील शेतकरी, मच्छीमार, व अन्य श्रमिक पुरुष व स्त्रियांनी 'पैसा घेणार भिकारी' ही घोषणा देऊन आपली निर्वाहसाधने वाचवण्याचा आणि कोकणचा विनाश-विक्री थोपवण्याचा एन्रॉनविरोधी लढा १९९४ पासून उभारला. त्यातूनच राज्यकर्ते करीत असलेला कोकणचा विनाश थांबवून निसर्ग सांभाळून लोककेंद्री विकासाचा पर्याय उभा केला पाहिजे हे अधोरेखित झाले. कोकणचा बचाव करून समुचित विकास साधण्यासाठी जनआंदोलने चालूच आहेत. त्याचा प्रारंभ करणाऱ्या आंदोलकांचे ऋण मोठे आहे.

कोकण किनारपट्टीच्या नागरीकरणाचे व औद्योगीकरणाचे पर्यावरणीय धोके याबाबत श्री.प्रकाश गोळे, वनीकरण व वृक्षलागवडीसाठी झाडांची निवड यावर श्री.वाय.जी.जाधव व ऊर्जा, पाणीसाठे यांचे समुचित तंत्रशास्त्र याबाबत श्री.के.आर.दात्ये यांच्या बरोबरच्या चर्चा व टिपणांच्या आधारे पुस्तिकेत मांडणी केली आहे. त्यांच्या सहकार्याबद्दल विशेष आभार.

पुस्तिकेची सुधारित वाढवलेली दुसरी आवृत्ती काढण्यासाठी आज कोकणमध्ये चालू असलेली विनाशकारी प्रकल्पांविरोधी आंदोलने याबाबतची माहिती प्रत्यक्ष चर्चा व लेखांमधून घेतली आहे. त्यासंदर्भातील सहकार्याबद्दल डॉ. विवेक भिडे, सतीश कामत, मंगेश चव्हाण, उल्हास वर्तक (केळशी), सुरेंद्र भडेकर (पावस), प्रवीण गव्हाणकर (माडबन) व त्यांचे सहआंदोलक यांचे विशेष आभार. औष्णिक प्रकल्पांच्या तांत्रिक माहितीसाठी अश्विन गंभीर व गिरीश संत यांच्या सहकार्याबद्दल आभार. पुस्तिकेचा मसुदा वाचून श्री. न. गुत्तीकर, प्रेरणा राणे, विजय कुलकर्णी, गुरुनाथ पेडेणेकर, कमलाकर देव यांनी बहुमोल सूचना केल्या. त्याबद्दल आभार.

- सुलभा ब्रह्मे

---

धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधनमाला - २१

---

कोकणचा विकास की विनाश?

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे

प्रथम आवृत्ती : ५ जून १९९७, पर्यावरण दिन. दुसरी आवृत्ती : ५ जून २००८

मुखपृष्ठ : ेमलिंद जाशिी, अनुमि ेक्रएशन्स, २/१४, मारवा, अनुमि ािर्क, ुिण २ि९

प्रकाशक - मुद्रक : सुलभा ब्रह्मे, १२९ ब/२, एरंडवणे पुणे ४.

अक्षरजुळणी : यश अक्षरजुळणी, पुणे ३०, मुद्रणस्थळ : श्रीपाद क्रिएशन, पुणे ३७

किंमत : १० रुपये

# प्रस्तावना

कोकणचा विकास म्हणजे वीज प्रकल्प , खाणी व कारखान्यांची वाढ असे अंध समीकरण सरसहा केले जाते. या मागचे एक महत्तवाचे कारण म्हणजे शेती, फळबागा फुलवण्यासाठी स्वत... प्रयत्न करावे लागतात. त्याऐवजी कोठल्यातरी कंपनीने कारखाना घातला आणि नोकरी मिळाली, की आपली जबाबदारी संपली ! वादळ होवो, पाऊस अवेळी पडो, ढगाळ वातावरण बनो नुकसानीचा काही धोका नाही असा समज असतो. कारखान्यात नोकरी मिळावी म्हणून तांत्रिक शिक्षण, उच्च शिक्षण याची सोय व्हावी, संधी मिळावी ही मागणी पुढे येते, परंतु कारखान्यात किती जणांना रोजगार मिळतो याचा विचार केला जात नाही. कारखान्यांचे बांधकाम चालू असताना अंगमेहनतीचे बिगारी काम मिळण्याची शक्यता असते. पण हे काम शेतकरी-मच्छीमारांना पेलते असे नाही. वर्षा-दोन वर्षांत बांधकाम संपले की हे कामही बंद होते. कारखान्यात नोकरी मिळण्याची शक्यता १०० शेतकऱ्यांमागे दोन-चारानाच. कारण आधुनिक कारखाने स्वयंचलित यंत्रे, संगणक या आधारे चालत असल्याने तेथे कामाला मोजके आणि तेही मुख्यत... उच्चशिक्षित नोकरदार लागतात. सामान्य श्रमिकांना तेथे थारा नाही. त्यामुळे एनरॉनसारख्या वीजप्रकल्पाचे उदाहरण घेतले तर प्रकल्पामुळे हजारो शेतकरी व मच्छीमार कुटुंबाचे नुकसान झाले. तर नोकऱ्या मोजक्याच मिळाल्या होत्या.

रोजगाराबरोबर पर्यावरणाचाही प्रश्न महत्तवाचा आहे. कोकणची निरुंद किनारपट्टी औद्योगीकरण, वाढते प्रदूषण आणि नागरिकीकरण यामुळे उद्ध्वस्त व्हायला लागली आहे. त्यामुळे सागरी संपत्ती, किनारे आणि वृक्षसंपदा, दुर्मिळ वनस्पती व प्राणीसृष्टी नष्ट होऊन कधीच भरून न निघणारे असे कोकणचे नुकसान होते आहे.

महत्तवाची बाब म्हणजे कोकणामधील नैसर्गिक अनुकूलता लक्षात घेता निसर्गसंपत्तीच्या आधारे समृध्दी वाढवणे आणि तेथील श्रमिकांना ताठ मानाने, चांगले जीवन जगणे सहज शक्य आहे. पण त्यासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याची आणि सामूहिकरित्या नियोजन करून निसर्ग संपत्ती जोपासण्याची मात्र गरज आहे. कोकणच्या स्त्रियांकडे ही जिद्द आहे हे एन्रॉनविरोधी, एच.पी.सी.एल. विरोधी, ताजविरोधी, एम.आय.डी.सी.विरोधी तेथील स्त्रियांनी जे झुंजार लढे चिकाटीने दिले त्यावरून दिसून येते. तेव्हा शासकीय धोरणांमुळे कोकणवर लादल्या जात असलेल्या विनाशकारी प्रकल्पांविरोधात आज उभी राहात असलेली जनआंदोलने यांचे एकसंधीकरण आणि अखिल कोकणपातळी व राज्य पातळीवरून त्याला पाठबळ देणे आवश्यक आहे. आपली शेते, आपले डोंगर, आपली जंगले, आपले समुद्र किनारे यावरचा ताबा परदेशी व देशी बडया कंपन्यांच्या हाती जाऊन कोकणवासी श्रमिक आपल्या निसर्गाला आणि अस्मितेला मुकण्याचा धोका संघटितपणे रोखणे आणि समुचित विकासाची रूपरेषा बनवून त्याचा पाठपुरावा करणे हे कोकणच्या श्रमिकांपुढील मोठे आव्हान आहे. हे आव्हान स्वीकारण्यास कोकणचा श्रमिक सरसावला आहे. फळबागायतीच्या अनुदानाच्या आधारे कातळाच्या जमिनीत आंबा-काजू फुलवत आहे. गिरणगावातून गावी परतलेला कामगारही शेती-वाडी समृध्द करण्याच्या प्रयत्नात आहे.

आजवर कोकणच्या विकासाच्या प्रश्नावर अनेक समित्यांनी विचार केला-स्वामिनाथन् समिती व खताळ समिती (सिंचन विकास), कल्याणी समिती (बंदरे विकास), भाई सावंत समिती (मासेमारी विकास), पी. के. सावंत समिती (कुटिर उद्योग विकास), अडारकर समिती (उद्योग विकास), भाऊसाहेब वर्तक समिती (शिक्षण विकास), जयंतराव पाटील समिती (फलोद्यान, वनीकरण इ.), बालिअप्पा समिती (जलविद्युत प्रकल्प). या समित्यांचे अहवाल विचारात घेऊन विविध महामंडळे स्थापन करण्यात आली आणि बहुविध योजना जाहीर झाल्या. परंतु त्या केवळ नोकरशाही दफ्तरदिरंगाई, वशिलेबाजी व भ्रष्टाचाराच्या वर्तुळात फिरत राहिल्या. कोकण रेल्वे वगळता, बंदर विकास, मत्स्यव्यवसाय विकास, सिंचन विकास आदी कोणत्याच पायाभूत सुविधांचा व व्यवसायांचा विकास केला गेला नाही. परिणामी आजही तरुणांचे डोळे असतात मुंबईकडे ! त्यामुळे कोकण अधिकच दुर्लक्षित राहून बडया कंपन्यांना त्यांच्या फायद्याप्रमाणे लूट करायला मोकळे रान मिळते. कोकण रेल्वे आल्यावर हे आक्रमण अधिकच तीव्र बनले आहे. शासनाने नवीन आर्थिक धोरण १९९१ साली स्वीकारल्यावर तर कोकणातील शेतकरी व मच्छीमारांना देशोधडी लावून कोकणची बंदरे व किनारपट्टी बहुराष्ट्रीय व बडया भारतीय कंपन्यांना बहाल करण्याचे देशविकाऊ धोरण शासन रेटत आहे. त्यामुळे कोकणी श्रमिकांपुढे जीवनमरणाचा प्रश्न उभा ठाकला आहे.

प्रचलित भांडवली विकासाच्या ढाच्यात हा प्रश्न सोडवणेच शक्य नाही. कारण प्रचलित विकासनीती ही खाजगी नफा-केंद्री व त्यासाठी माणसाचा, निसर्गाचा बळी घेणारी अशीच आहे. कोकणवासीय अभ्यासकांनी कोकणच्या प्रश्नावर विचारमंथन केलेले आहे. (उदा. 'कोकणचे आव्हान' : अनिल सामंत, 'कोकण स्वप्न आणि वास्तव' : जयानंद मठकर, 'कोकण रेल्वे आणि विकासाची संधी' : प्रा. गोपाळ दुखंडे व संध्या म्हात्रे). यामध्ये कोकणच्या प्रश्नांचे विष्लेषण केलेले आहे, आणि समस्यांवरील उत्तरे ही प्रामुख्याने शासकीय समित्यांच्या शिफारशी व शासकीय योजनांच्या चौकटीत दिली आहेत. आज गरज वाटते ती उपरी कारखानदारी व वीजनिर्मिती केंद्रे, पंचतारांकित उपरे पर्यटन, कृत्रिम कोळंबी उत्पादन आदी विनाशकारी विकास(?) प्रकल्पांना नकार देऊन पर्यायी लोककेंद्री विकासमार्गाचा शोध घेण्याची. प्रचलित घातक उद्योगीकरण-नागरिकीकरणाचा धावता आढावा घेऊन हरितीकरण, फलोद्याने, वनीकरण, मत्स्यव्यवसाय याबाबत पर्यायी दिशांचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तिकेत केला आहे. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया, सूचना व पर्यायी प्रयत्नांबाबतची माहिती पाठवून पर्याय उभारण्याच्या मंथनात सहभागी व्हावे अशी विनंती.

सुलभा ब्रह्मे

# कोकणची वैशिष्टये व ऐतिहासिक वारसा

नैसर्गिक वैशिष्टये : ७२० किलोमीटर लांब समुद्र किनारपट्टी आणि सह्याद्री पर्वतराजीच्या मधील ५० ते ९० किलोमीटर निरुंद भूप्रदेशाचा पट्टा म्हणजे कोकण. समुद्रापासून नजीकच टेकडयांनी व्याप्त उंचसखल पठारे आणि त्यालगत सह्याद्रीचे फाटे यामुळे कोकणात सपाट व शेतीयोग्य भूभाग फारच मर्यादित आहेत. सह्याद्रीच्या रांगातून अनेक लहानमोठया पश्चिम वाहिनी नद्या अरबी समुद्राला मिळतात. या नद्यांच्या मुखाशी प्रमुख खाडया बनलेल्या आहेत. समुद्र सान्निध्यामुळे उबदार व दमट हवा आणि १००० ते १५०० मीटर उंच सह्याद्रीच्या रांगामुळे मान्सूनचा मुसळधार पाऊस हे कोकणचे वैशिष्टय. सह्याद्रीनजीक ३००० ते ३५०० मि.मी. पाऊस तर किनारपट्टीजवळ २००० ते २५०० मि.मी. पाऊस सरासरीने पडतो. नैसर्गिक अनुकूलतेमुळे समृध्द जंगले आणि झाडे-झुडपे, वेली, पक्षी, प्राणी यातील विविधता हे कोकणचे दुसरे वैशिष्टय.

मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे कोकणचे पाच जिल्हे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात लोखंड, ॲल्युमीनियम, मँगानीज, क्रोमाईट, मायका, इल्मेनाईट ही खनिजे, रत्नागिरीत इल्मेनाईट व सर्व जिल्ह्यांमध्ये बॉक्साईट ही महत्तवाची खनिजे सापडतात. समुद्र किनाऱ्यालगत मिठाचे उत्पादन होते. मच्छिमारी हा कोकणामधला महत्तवाचा व्यवसाय.

ऐतिहासिक वारसा : कोकणच्या व्यापारी भरभराटीचे उल्लेख बौध्द काळापासून आढळतात. कोकणमधील इतिहासकालीन महत्तवाची बंदरे म्हणजे वेंगुर्ला, मालवण, जैतापूर, देवगड, रत्नागिरी, दाभोळ, हरणाई, बाणकोट, श्रीवर्धन, रेवदंडा, सोपारा, चौल. दाभोळ व चौल ही बंदरे गोवे व सुरत यांबरोबरची समजली जात. तेथून इराण, अरेबियाशी व्यापार चाले. तसेच मलबार, गोवा, गुजरातबरोबर व्यापार चाले. ही बंदरे नद्यांमार्गे जलवाहतुकीमार्फत नद्यांच्या मुखापासून साधारण ३०/४० किलोमीटर अंतरावरील सह्याद्रीच्या पायथ्यानजीकच्या महत्तवाच्या बाजारपेठांशी जोडलेली होती. डहाणू, तारापूर, वसई, आगाशी, माहीम, महाड, नाघोटणे, दासगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर, राजापूर, खारे पाटण, सावंतवाडी या इतिहासकालीन महत्तवाच्या बाजारपेठा होत. बंजारांचे तांडे देशावरून घाट मार्गे गूळ, साखर, कापूस, तेल, रेशीम, तांबे, तंबाखू, मिरची, गहू, डाळी, कापड, दारू इत्यादी माल कोकणात आणीत आणि कोकणमधून तांदूळ, मीठ, लाकूड, नारळ, सुपारी निर्यात होई. याशिवाय आंतरराष्ट्रीय व्यापार चाले तो वेगळा. डोंगराळ प्रदेश, खाडया व नद्या यामुळे रस्त्याने वाहतूक फारच कठीण होती त्यामुळे जलवाहतूकच महत्तवाची होती.

कोकणमधले प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती, कारागिरी, मच्छीमारी, व्यापार व वाहतूक, विणकाम, कुंभार काम, सुतार काम, जाळी विणणे, लाकडी खेळणी, बोटी बांधणे, तांबे-पितळे भांडी, चटया, दोर, टोपल्या विणणे, चांभार काम, मिठागरे इत्यादी उद्योग महत्तवाचे होते. शिवाय शिवकालामध्ये मराठयांच्या सैन्यात

कोकणमधून भरती होई. निसर्गाचा वरदहस्त असला तरी त्या काळातील वाहतूक व दळणवळणाच्या साधनांच्या विकासाच्या मर्यादेमुळे कोकणच्या विकासक्षमतेचा मर्यादितच उपयोग करणे शक्य होते. नैसर्गिक बंदरांच्या फायद्यामुळे प्रामुख्याने व्यापार-उदिमाची भरभराट होती. त्याचे प्रतिबिंब म्हणजे दाभोळ बंदरामध्ये बऱ्याच सुंदर इमारती, देवालये, मशिदी होत्या असे उल्लेख आढळतात.

कोकणचा ऱ्हास : मराठी सत्तेचा लोप होऊन १८१८ साली ब्रिटिश राजवट स्थापन झाल्यावर कोकणच्या आर्थिक पिछेहाटीला सुरवात झाली. मराठी राज्याच्या अस्ताबरोबर हजारो सैनिक कोकणात परतले. शेतीशिवाय कोणतेच उपजीविकेचे साधन त्यांच्याजवळ नव्हते. मराठी सैन्य व राज्यासन नष्ट झाल्याने कोकणमधील मालाची मागणी घटली व त्याचा कोकणच्या बाजारपेठेवर दूरगामी परिणाम झाला. ब्रिटिशांनी मुंबई बंदराचा विकास सुरू केला व तेथून बोरघाटमार्गे पुणे व दक्षिण भारतास व उत्तरेस गुजरातेस जोडणारे रेल्वेमार्ग बांधले. त्यामुळे देशावरचा माल कोकणच्या बंदरामध्ये उतरण्याची गरज उरली नाही. राज्यातील व्यापारी वाहतूक मुंबईमार्गे वळवली जाऊन कोकणचा व्यापार घटला व कोकण एकाकी पडले.

रत्नागिरी जिल्ह्याच्या ऱ्हासाचे याहूनही महत्तवाचे कारण म्हणजे १८२९ साली रत्नागिरीचे कलेक्टर डनलॉप यांनी जंगल तोडीवरचे शिवकालीन व पेशवेकालीन निर्बंध उठवले. कारण रेल्वेच्या रुळांखालील तुळया, रेल्वेचे डबे, जहाजे, इमारती यासाठी लाकडाची व्यापारी मागणी प्रचंड प्रमाणात वाढली होती. रत्नागिरी जिल्ह्यात साग, शिसवी, ऐन, किंजळ, धावडा, खैर, पाईर यांची समृध्द जंगले होती. रत्नागिरीहून जलमार्गे लाकूड वाहतूक सोपी होती. लाकूड तोडीवरचे निर्बंध उठवल्यावर सावंतवाडी संस्थान सोडून संबंध रत्नागिरी जिल्ह्यात एवढी प्रचंड जंगलतोड झाली की पन्नास वर्षातच रत्नागिरीतली जंगले समूळ नष्ट झाली. २/३ महिन्याच्या अवधीत ३००० मि.मी. पाऊस सह्याद्रीच्या बोडख्या उतारावरून वाहून डोंगरांची व जमिनीची प्रचंड धूप सुरू झाली व नद्या व बंदरे गाळाने भरू लागली. रत्नागिरीतली जलवाहतूक थंडावू लागली. भातखाचरे उद्ध्वस्त झाली. तांदूळ निर्यात करणारा रत्नागिरी जिल्हा पुरेसा तांदूळ पिकत नाही म्हणून माणसे निर्यात करू लागला.

त्याच काळात मुंबई बंदराची व्यापारी वाढ होत होती. मुंबईत कापड गिरण्या उभ्या राहात होत्या. गोदीमध्ये, गिरणीमध्ये कामाला माणसे हवी होती. रत्नागिरीतून पोटासाठी कोकणची माणसे मुंबईकडे वळू लागली. पण बहुसंख्यांनी कोकणशी असलेली नाळ तोडली नव्हती. ब्रिटिश राजवटीत कोकणच्या विकासासाठी कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. तेथील निसर्गसंपत्ती ओरबाडल्यामुळे कोकणचा ऱ्हासच झाला आणि पोटासाठी कोकणी माणसाला कोकण सोडावे लागल्याने कोकण अधिकच दुर्लक्षित राहिले. स्वातंत्र्योत्तर काळातही कोकणची उपेक्षा चालूच राहिली. एवढेच नव्हे तर विनाशकारी उद्योग लादून

कोकणमधील निसर्ग व शेतकरी-मच्छीमार यांचे जीवन उध्वस्त करण्याचे धोरण शासन रेटू लागले.

रत्नागिरी जिल्ह्यात १९८१ पासून उद्योगांची वाढ सुरू झाली ती प्रामुख्याने रासायनिक कारखान्यांच्या रुपात. समुद्रसांनिध्याचा व येऊ घातलेल्या कोकण रेल्वेचा फायदा घ्यायचा, नदीनाले व समुद्राचे पाणी बिनदिक्कत प्रदूषित करायचे आणि वर कोकणच्या विकासाचा डांगोरा पिटायचा ! सरकारने एमआयडीसीसाठी जमिनी ताब्यात घेतल्यामुळे हजारो शेतकरी देशोघडी लागले. कारखाने आधुनिक तंत्रज्ञानावर भर देणारे भांडवल प्रचुर असल्यामुळे स्थानिक लोकांना कायम रोजगार मिळण्याची शक्यता नगण्य. वर प्रदूषणामुळे फळबागा व मच्छिमारीवर अनिष्ट परिणाम झाल्याने फळउत्पादक व मच्छिमारांचे अपरिमीत नुकसान असा हा विकास ! अशी घातक कारखानदारी म्हणजे विकास नव्हे तर विनाश आहे ही वस्तुस्थिती लोकांना जाणवू लागली आणि लोक त्याच्या विरोधात उतरले.

## कोकणच्या जनेतचा विनाशकारी प्रकल्पविरोधी संघर्ष

स्टरलाईट, फिनोलेक्स आदी कंपन्यांमुळे प्रदूषणाचा वाढता धोका लोकांच्या लक्षात आला. विशेषत... स्टरलाईटच्या तांबे शुध्दीकरण कारखान्यामुळे आम्ल-पाऊस पडून आमराया उध्वस्त होण्याचा धोका पुढे आल्यावर तर स्टरलाईट विरोधी कृतीसमिती स्थापून रत्नागिरीतील बागायतदार, शेतकरी, कर्मचारी, व्यापारी, व्यावसायिक, इ. लोकांनी विरोध संघटित केला. सभा, निदर्शने, याबरोबरच सामाजिक बहिष्काराचे हत्यार जनतेने उचलले. स्टरलाईट कंपनीची बांधकाम, मालपुरवठा इत्यादी कंत्राटे नाकारणे, स्टरलाईटचे अधिकारी, कर्मचारी यांना हॉटेल, रिक्षा, दुकाने, इ. सेवा नाकारणे अशा सार्वत्रिक बहिष्काराने त्यांची कोंडी करण्यात आली. स्टरलाईटविरोधी लढयाची धार वाढत गेली आणि एकूणच रासायनिक कारखानदारीच्या वाढीला विरोध वाढू लागला. २७ एप्रिल १९९४ रोजी कोकणवासीय शेतकरी, कामगार, कर्मचारी व इतर नागरिक यांचा विराट मोर्चा 'स्टरलाईट हटाव', 'एन्रॉन हटाव' या घोषणा घेऊन संघटित करण्यात आला. त्यामुळे मात्र शरद पवार शासनाचे धाबे दणाणले. पर्यावरणीय व कायदेशीर तरतुदी धाब्यावर बसवून आर्थिक-तांत्रिकदृष्टया असमर्थनीय असा एन्रॉन या अमेरिकी कंपनीचा वीजप्रकल्प निविदा न मागवता पवार शासनाने आमंत्रित केला होता. त्या विरोधात लोकमत वळू देणे 'परवडणारे' नव्हते. स्टरलाईटला ताबडतोब रत्नागिरी सोडण्याचे आदेश गेले. आणि एन्रॉनला विरोध होता कामा नये असे पवारांनी बजावले.

गुहागर-चिपळूण तालुक्यांमध्ये देवघरजवळ रिफायनरी प्रकल्प, निवळी फाटा, साखरी व दाभिळजवळ औद्योगिक वसाहत विस्तार अशा योजनांसाठी जमिनीचे संपादन एम.आय.डी.सी.ने सुरू केले. अशा विनाशकारी कारखान्यांऐवजी कोकणच्या निसर्गसंपत्तीचा सुयोग्य वापर करून त्याआधारे प्रदूषणमुक्त उद्योगव्यवसाय वाढवावे अशी मागणी लोकांनी जोरात पुढे आणली. आखिल जगात फक्त रत्नागिरी जिल्ह्यात अस्सल हापूस आंबा पिकतो. तेथे आमराया वाढवायला मोठा वाव आहे. शिवाय नारळ, सुपारी,

काजू, कोकम, मिरे, जायपत्री, औषधी वनस्पती अशा कितीतरी मौल्यवान पिकांची वाढ माफक गुंतवणुकीत शक्य आहे. असे असताना कोकणचा कॅलिफोर्निया करण्याऐवजी कारखानदारी लादून कोकणचे वाळवंट करण्याच्या विरोधात लोकचळवळ वाढली. एन्रॉन विरोध हा या व्यापक चळवळीचा भाग होता.

एन्रॉन विरोधी लढा : पाच जून १९९४ ला पर्यावरण दिनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वर्कर्स फेडरेशनच्या पुढाकाराने श्रृंगारतळी (गुहागरनजीक) येथे वीज कर्मचारी, राज्य कर्मचारी, बँक, विमा, एस.टी. कर्मचारी व अन्य कामगार, कर्मचारी युनियन्स, कोकण संघर्ष समिती व शेतकरी, मच्छीमार, व्यापारी आदी विविध स्तरातले कोकणवासी स्त्री-पुरुष यांच्या उपस्थितीत एन्रॉनविरोधी विराट परिषद घेण्यात आली. सरकारने एन्रॉन प्रकल्प स्वीकारला तरी कोकणची जनता, अखिल महाराष्ट्राची जनता एन्रॉनची भारतातून हकालपट्टी करील असा निश्चय परिषदेत जाहीर करण्यात आला. त्यासाठी अखिल महाराष्ट्र पातळीवर एन्रॉनविरोधी संघर्ष समिती, तसेच रत्नागिरी जिल्ह्यात, गुहागर तालुक्यात व एन्रॉन प्रकल्पग्रस्त अंजनवेल, कातळवाडी, बोरभाटलेमाळ, वेलदूर, रानवी येथे एन्रॉनविरोधी संघर्ष समिती स्थापन करण्यात आल्या. परिषदा, पोष्टर प्रदर्शन, पुस्तिका, पत्रके यामार्फत मुंबई, पुणे, कोल्हापूर आदी शहरात व गुहागर तालुक्यात गावोगावी लोकांशी संवाद सुरू करण्यात आला. तेव्हापासून संघर्षाला तोंड फुटले. शासनाने पोलिसी जुलूमजबरदस्ती, कडक बंदी हुकूम, धरपकड, तुरुंगवास अशा दडपणुकीच्या मार्गाने सक्तीने जमीन संपादन सुरू केले. तर शासकीय दंडुकेशाहीला प्रकल्पग्रस्तांनी प्रखर विरोध केला. महाराष्ट्रातील श्रमिक जनताही एन्रॉनविरोधी लढयात सामील झाली.

सहा मार्च १९९५ रोजी गुहागर येथील जाहीर सभेत भा.ज.प.चे नेते गोपीनाथ मुंडे यांनी जाहीर केले की एन्रॉनविरोधी लढा तेव्हाच थांबेल जेव्हा एन्रॉन प्रकल्प हद्दपार केला जाईल. एन्रॉन विरोधाच्या लाटेवर स्वार होऊन १९९५ साली भाजप-शिवसेना युती महाराष्ट्रात सत्तारूढ झाल्यावर मात्र ठाकरे-मुंडे यांनी घूमजाव करून अधिक घातक अटींवर एन्रॉन प्रकल्पाची धोंड महाराष्ट्राच्या गळ्यात बांधली. त्या विरोधात ३० जानेवारी १९९७ रोजी सत्याग्रह ठरला, तेव्हा शासनाने कडक बंदी हुकुम लादून व हजारो पोलीस तैनात करून मोठी दडपशाही केली. तरी एन्रॉन विरोधी सत्याग्रहात ७००० पेक्षा अधिक स्थानिक व अन्य ठिकाणचे आंदोलक उतरले. आंदोलकांवर लाठीमार, अश्रुधूर याचा मारा करून शासनाने १२०० सत्याग्रही अटकेत डांबले.

'पिण्याचे पाणी, शेती आणि मग उद्योगधंदें असे शासनाचे धोरण असताना एन्रॉन पुढे सगळे गुंडाळून ठेवून शासनयंत्रणा 'त्यांच्या' सेवेसाठी गावच्या माणसाला माणसासारखे जगू देत नव्हती. एन्रॉन प्रकल्पाच्या स्थानावर तळ ठोकून राहणाऱ्या दाभोळ पॉवरच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारची पोलीस यंत्रणा डोळ्यात तेल घालून संरक्षण देत होती. एन्रॉन प्रकल्पावर पोलीस संरक्षणात सामग्री जमा होत होती. अन्नधान्याची

रसद  घेऊन जाणाऱ्या वाहनांना मागेपुढे पोलीस संरक्षण होते. विरोधाची नुसती शंका आली तरी पंचक्रोशीतला कुणी ना कुणी गजाआड होत होता. या एन्रॉनधार्जिण्या व लोकविरोधी धोरणाचा निषेध करत गावकरी पुन्हा पुन्हा पेटून उठत. अशा रीतीने एन्रॉनविरोधी लढा जनतेने चिकाटीने वर्षांनुवर्षे चालू ठेवला. दरम्यान इतरही अनेक घातक प्रकल्प कोकणवर लादण्याचा शासनाचा प्रयत्न होता. त्याविरोधातही कोकणची जनता प्राणपणाने लढली.

- १ नोव्हेंबर १९९४ ... 'कोकणला रासायनिक पट्टा घोषित करणारे विधेयक मागे घ्या,' 'कोकणात रासायनिक कारखानदारीसाठी प्रस्तावित औद्योगिक वसाहतींचे भूसंपादन त्वरित थांबावा,' 'एन्रॉन प्रकल्प रद्द करा,' 'रोजगारनिर्मिती डोळ्यासमोर ठेवून फलोद्यान, मत्स्यव्यवसाय व शेतीविकास व त्यावर आधारित प्रक्रिया उद्योगावर भर द्या', आदी मागण्या करणारे ठराव रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ येथील प्रदूषणकारी कारखानदारी विरोधी परिषदेत मंजूर करण्यात आले.
- गोरगरीब शेतकरी व कष्टकऱ्यांच्या चरितार्थाचे साधन असलेल्या जमिनी हिरावून घेऊन तेथे ओद्योगिक वसाहत उभारण्यास शेतकरी प्राणपणाने विरोध करतील असा ठाम निर्धार निवळी, भोके, करबुडे परिसरातील (६९० हेक्टर) शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा काढून व्यक्त केला.
- २६ सप्टेंबर १९९५... हिंदुस्थान ओमान पेट्रोलियम रिफायनरीसाठी मार्ग ताम्हाणे, ताम्हाणे खुर्द, कलमुंडी, देवघर, मढाळ, झोंबडी येथील ८०० हेक्टर जागा संपादन करण्यासाठी मोजणी प्रयत्न ग्रामस्थांनी उधळून लावला. २७ डिसेंबरला मोठया पोलिस फाटयासह मोजणी अधिकारी आल्यावर २००० ग्रामस्थांचा भा.ज.प.च्या आमदार नातूंच्या घरावर (मार्ग ताम्हाणे) मोर्चा.
- २३ जुलै १९९६... ताज या पंचतारांकित हॉटेलकरता शिरोडा-वेळागर येथे भूसंपादन सर्वेक्षणाला मच्छीमारांचा विरोध. कडेवर लहान मुले घेऊन विरोध करणाऱ्या महिलांवर पोलिसांचा बेछूट लाठीमार.
- २२ सप्टेंबर १९९६... रेवस-मांडवा विमानतळाच्या परिसरात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला रेवस, मांडवा, बोडणी, दिघोडी, धोकोवडे येथील भूमीपुत्रांच्या  घरादारांवर नांगर फिरवणाऱ्या या प्रकल्पाला ग्रामस्थांचा प्रखर विरोध.
- २५-२६-२७-२८ मार्च १९९७... कोकण संघर्ष यात्रा-वेळागर (ता. वेंगुर्ला), सातर्डे (ता. सावंतवाडी), कणकवली, ओणी (ता. राजापूर), निवळी (ता. रत्नागिरी), चिपळूण अशी दक्षिण यात्रा आणि चेंबूर, नेरे (ता. पनवेल), पाताळगंगा परिसर, पेण, रेवस-मांडवा, नागोठणे, लोटे (ता. खेड), मार्ग ताम्हाणे अशी उत्तर यात्रा महाराष्ट्र मच्छिमार संघटना, मुंबई, वेळागर संघर्ष समिती, एन्रॉनविरोधी संघर्ष समिती, उषा-इस्पात विरोधी संघर्ष समिती, सातर्डे, एच.ओ.पी.सी.एल. विरोधी संघर्ष समिती, पाताळगंगा प्रदूषण विरोधी संघर्ष समिती, धरमतर खाडी बचाव कृती समिती, प्रदूषण व बेकारी हटाव कृती समिती आदी संघटनांनी २५

ते २८ मार्च १९९७ या दिवशी संघटित केली व २८ मार्चला गुहागरला एकत्रित समारोप केला. त्यामागची कोकणवासियांची भूमिका, कोकण संघर्ष समितीच्या पत्रकातून स्पष्ट होते:

‘‘निसर्ग संपत्तीने संपन्न अशा कोकणाचा विनाश करणारी आणि कोकणी भूमिपुत्राला समूळ उखडून टाकू पाहणारी विनाशकारी विकास (?) प्रक्रिया कोकणात उभी केली जात आहे. देशाची आणि कोकणाची आर्थिक प्रगती त्या विकास पध्दतीमुळे होईल असा भ्रम शासनकर्ते, भांडवलदार, ठेकेदार आणि त्यांचे हितसंबंधित समर्थक उभा करीत आहेत. कोकणातील डोंगर, नद्या, खाडया, सुपीक जांभ्या दगडाची जमीन, समुद्र, फळबागा, जंगले, शेती आणि त्या सर्वांच्या आधाराने ताठ मानेने जगणारा कोकणी माणूस-शेतकरी, कारागीर आणि मच्छिमार यांना संपवीत आपला धनसंचय करू इच्छिणारी अशी ही विकास पध्दती आहे. रासायनिक कारखाने, पर्यटनप्रणीत हॉटेल्स, मोटेल्स, फार्म हाऊस, अभयारण्ये यांच्यासहित बंदरांचे खाजगीकरण, शेतकऱ्यांच्या जमिनींची वारेमाप खरेदी, एम.आय.डी.सारखा सक्तीचा व लोकशाहीविरोधी कायदा लावून खाजगी कंपन्यांना दामदुप्पट नफा मिळवून देण्यासाठी केले जाणारे भूमिसंपादन, दिल्या जाणाऱ्या सोयी-सवलती हे सर्व त्यांच्या विकास पध्दतीत आहे. कोकणातील नद्या, खाडया, समुद्र, जमीन, झाडे इ.चा वारेमाप दुरुपयोग करून हे नैसर्गिक स्रोत कायमचे संपविणे हे त्यांचे पहिले काम. त्या स्रोतांचे आधाराने आपली शेती, मच्छिमारी करणाऱ्या भूमिपुत्राला रस्त्यावर आणून निराधार करणे हे दुसरे काम आणि रोजगार, पंचतारांकित विकासाचे व देशहिताचे भ्रम निर्माण करून आपला धनसंचय करणे हा त्यांचा गर्भित हेतू आहे. त्यांचे समर्थन करीत आहेत स्वार्थी, लबाड, समाजहिताची जाणीव नसलेले मध्यस्थ व दलाल."

‘‘त्या संपूर्ण विकास पध्दतीतून दहा टक्क्यांचे हित व ९० टक्क्यांचा विनाश होणार आहे हे उघड आहे. त्या अन्यायकारक पध्दतीला संपूर्ण कोकणातील गरीब पण जागरूक जनता प्रामाणिकपणे विरोध करीत आहे. भारतीय उपक्रमांना डावलून गुहागर पट्ट्यातील नैसर्गिक स्रोत व जीवनधारा संपवू पाहणाऱ्या, जगात भ्रष्ट म्हणून कुप्रसिध्द असलेल्या, डॉलर्सच्या प्रमाणरूप किमतीत महागडी वीज भारतीयांच्या माथी मारू पाहणाऱ्या दाभोळ वीज कंपनी (एन्रॉन) विरोधात स्थानिक जनतेबरोबरच देशभरातील जागरूक लोकचळवळींनी तीव्र संघर्ष पुकारला आहे. वेळागर येथे स्थानिकांच्या जमिनी जबरदस्तीने बळकावू पाहणाऱ्या राजकारणी धनदांडग्यांविरोधात तेथील स्थानिक व सिंधुदुर्गीय जनता प्राणपणाने लढत आहे. मुंबई शहराचा विस्तार लादून स्थानिकांना बेघर करू पाहणाऱ्या मुंबई महानगर प्राधिकरण (बी.एम.आर.डी.) आराखडयाविरोधात पेण, पनवेल, अलिबागमधील जनता उभी ठाकली आहे. मत्स्यव्यवसाय व समुद्राच्या रक्षणासाठी किनारपट्टीचे मच्छिमार एकवटले आहेत. असे कित्येक लढे ठिकठिकाणी संघटित होत आहेत. ही कोकणी आणि भारतीय जनतेच्या लढयाची नांदी आहे."

“संपूर्ण भारतावर अमेरिकेसारख्या बलाढय राष्ट्रांच्या साम्राज्यवादाचे अंकित झालेल्या, ८०% भारतीयांचे शोषण करू पाहणाऱ्या विकास पध्दतीचे सावट पसरले आहे. त्याविरुध्द भारताच्या रक्षणासाठी प्राणपणाने लढून स्वातंत्र्याची उभारणी करणे आता आवश्यक झाले आहे. त्या विकास पध्दतीचा निर्धारित बळी ठरलेल्या कोकणामध्ये म्हणूनच लढयांची एकजूट आणि सामथ्र्य बांधणी गरजेची आहे. आमचा विकास कशात आहे हे ठरविण्याचा अधिकार आमचा आहे आणि तो आम्हाला माहीत आहे. कोकणातील निसर्गदत्त अशा जीवनधारांना टिकवीत निरंतर व चिरंजीवी विकासाची आमची परंपरा आहे व त्या पध्दतीनेच खऱ्या अर्थाने कोकण अधिक समृध्द होईल ही आमची भूमिका आहे. म्हणूनच विनाशकारी विकास पध्दतीला पराभूत करण्यासाठी, तिचा प्रमुख प्रतिनिधी ‘एन्रॉन'ला हटविणे हे आपले पहिले लक्ष्य आहे."

बहुराष्ट्रीय व बडया भारतीय कंपन्या, त्यांच्याशी संगनमत करून भारी कमिशन उपटणारे राज्यकर्ते व अधिकारीवर्ग, बांधकाम पुरवठा आदी कंत्राटांतून मोठा नफा उठविणारे ठेकेदार व व्यापारी आणि त्यांचे आश्रित नोकरदार व पोलीस पलटणी विरुध्द कोकणचे भूमिपुत्र शेतकरी, मच्छिमार, चांभार, सुतार, लोहार, बुरूड आदी कारागीर स्त्री-पुरुष यांमध्ये १९९४ पासून अटीतटीची लढत चालू आहे.

## बहुराष्ट्रीय व बडया कंपन्यांचे कोकणवरच आक्रमण का?

मुंबईचे सान्निध्य हे पहिले कारण. मुंबई शहर हे अखिल भारताची औद्योगिक-व्यापार-वित्त व्यवहाराची राजधानी आहे. महामुंबईमध्ये १.२ कोटी म्हणजे देशातील १.५% लोकसंख्या आहे. भारताचा ४२% परकीय व्यापार, ७०% शेअर बाजार उलाढाल, ५५% वित्तव्यवहार, ४०% कंपन्या, ३३% करपात्र उत्पन्न मुंबई महानगरीत केंद्रित आहे. निमूळ पट्टीवर वसलेल्या मुंबईत एवढे अर्थव्यवहार कसे सामावणार? परिणामी मुंबईलगतच्या ठाणे जिल्ह्यात व रायगड जिल्ह्यात कारखानदारीचे मोठे अतिक्रमण चालू आहे.

वास्तविक पाहता १९४७ पासून मुंबईच्या विकेंद्रीकरणाची व महाराष्ट्राच्या समतोल आर्थिक विकासाची मागणी आहे. पण मुंबई महानगरीत जागतिक बाजारपेठेला जोडणारे सुसज्ज बंदर व वित्तव्यवहार यंत्रणा, भारतीय बाजारपेठेला जोडणारी रेल्वे व रस्ते व मोठी घाऊक बाजारपेठ उपलब्ध असल्याने उद्योगधंद्यांना भारतातील ते सर्वात किफायतशीर केंद्र आहे. त्यामुळे कागदोपत्री विकेंद्रीकरणाचे धोरण असले तरी मुंबईची अविरत वाढ चालूच राहिली. कोकणच्या विकासाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून कोकणच्या भूमीचा उपयोग फक्त मुंबईच्या विस्तारासाठी होत राहिला. त्याबरोबर शेतकऱ्यांच्या जमिनीचा सक्तीने ताबा व शेतकऱ्यांचा विरोध पोलिसी दडपशाही, प्रसंगी गोळीबार करून चिरडला गेला. औद्योगीकरणाने व नागरीकरणाने प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ होऊन मच्छिमारीवर घातक परिणाम झाला आणि मच्छिमाऱ्यांचीही निर्वाह साधने धोक्यात आली.

तळोजा, खोपोली, नागोठणे, पाताळगंगा, रोहा इ. ठिकाणच्या रासायनिक कारखान्यांच्या सांडपाण्यामुळे

नद्यांना गटारांचे स्वरूप आले. बोईसर-तारापूर परिसरातील सांडपाणी नवापूरजवळ समुद्रात सोडले जाते. परिणामी सातपाटीपासून दांडीपर्यंत मासेमारी उद्ध्वस्त झाली. नद्या व विहिरींचे पाणी प्रदूषित होऊन रोगराईत वाढ, हवेच्या प्रदूषणाने शेतीचे नुकसान व श्वसन, फुप्फुसाच्या रोगांत वाढ झाली. उद्योगांच्या वाढीबरोबर जमिनींच्या चढया किमतींमुळे घरांची सुविधा परवडणारी नसल्याने कामगार व अन्य श्रमिकांवर झोपडपट्ट्यांतले रोगराईग्रस्त, खडतर जीवन लादले जात आहे.

रायगडनंतर रत्नागिरी जिल्ह्यात एम.आय.डी.सी.ने औद्योगिक वसाहती उभ्या करण्यास प्रारंभ केला. चिपळूणजवळ लोटे-परशुराम, पोफळी-चिपळूण, गणे खडपोळी, रत्नागिरी (मिरजोळी) झाडगाव आदी वसाहती उभारल्या. लोटे-परशुराम वसाहतीतील प्रदूषित पाण्यामुळे लोटे, सोनगाव, कोतवली, अजगणी आदी गावांचे पिण्याचे पाणी दूषित झाले आहे. हवेच्या प्रदूषणामुळे आंबा, नारळ, सुपारीचे उत्पन्न कमी झाले. शिवाय झाडावरच फळे किडू, सडू लागली. डोकेदुखी, चक्कर आदी व्याधी वाढल्या आहेत.

कोकण किनारपट्टी ही रासायनिक उद्योग, वीजनिर्मिती केंद्र आदी उद्योगांच्या दृष्टीने किफायतशीर-‘आदर्श'जागा आहे. कारण तेथे आयात-निर्यात व्यापारासाठी बंदराची सोय आहे. प्रदूषित पाण्याची सरळ विल्हेवाट लावण्यासाठी समुद्रसांनिध्य आहे. वीजप्रकल्पामध्ये शीतकरणाकरता उचलण्यासाठी समुद्राचे पाणी हाताशी आहे. आता कोकण रेल्वे झाल्यामुळे सर्व भारताबरोबर दळणवळणाची सोय झाली आहे. कोकणमध्ये कोटयवधी रुपयांची औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्याची सरकारची वल्गना आहे. त्यामध्ये एन्रॉनचा वीजप्रकल्प, पेट्रोलियम रिफायनरी, उषा इस्पतचा पोलाद उद्योग, मिटमिटचा तांबे शुध्दीकरण असे अनेक प्रदूषण वाढवणारे उद्योग आहेत.

औष्णिक वीज प्रकल्प : आयात इंधन आधारित वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेण्याचे धोरण शासनाने स्वीकारल्याने कोकणवर मोठी धाड पडण्यास प्रारंभ झाला तो एन्रॉनच्या आगमनाने. रत्नागिरी जिल्ह्यात गुहागर तालुक्यात दाभोळ बंदराच्या दक्षिणेला अंजनवेल-कातळवाडी पठारावर एन्रॉनचा २१८४ मे.वॉ. क्षमतेचा आयात द्रवीभूत नैसर्गिक वायू या इंधनावर चालणारा वादग्रस्त एन्रॉन प्रकल्प १९९२ साली कोकणवर लादण्यात आला. एन्रॉन ही उचापती अमेरिकन कंपनी २००१ डिसेंबरमध्ये बुडल्याने तो रत्नागिरी गॅस ॲड पॉवर इंडस्ट्री लि.ने ताब्यात घेऊन २००६ साली कार्यान्वित केला. परंतु जनरल इलेक्ट्रिक कंपनीने सदोष वायूचक्की पुरवल्याने तो सतत बिघडत असून रडतखडतच चालतो आहे. त्याची क्षमता ५००० मे.वॉ. पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय पुढील सुमारे १५००० मे.वॉ. क्षमतेचे आयात कोळसा आधारित वीजप्रकल्प कोकणवर लादण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

१) शहापूर - (रायगड जिल्हा) - रिलायन्स - ४००० मे.वॉ., टाटा - ३००० मे.वॉ.

२) धोपावे - (दाभोळ खाडीच्या दक्षिण तीरावर, गुहागर तालुका, रत्नागिरी जिल्हा)

धोपावे कोस्टल पॉवर लि. - १६०० मे.वॉ.

३) जयगड़-जिंदाल (रत्नागिरी तालुका) - १२०० मे.वॉ.

४) रनपार-फिनोलेक्स (गणेशगुळेच्या उत्तरेस, रत्नागिरी तालुका) - १००० मे.वॉ.

५) अल्टामेगा प्रकल्प (सिंधुदुर्ग जिल्हा) - ४००० मे.वॉ.

अल्टामेगा औष्णिक प्रकल्प : सिंधुदुर्ग जिल्ह्यात गिर्ये-सौंदाळे येथे ४००० मे.वॉ. क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्प प्रस्तावित होता. परंतु तेथील जनतेच्या तीव्र विरोधामुळे मालवण तालुक्यात आचऱ्या नजीक खोडोपी या स्थळाचा विचार चालू झाला. चार हजार मेगावॅट वीज निर्माण करण्यासाठी दररोज ४० हजार टन कोळसा वापरावा लागेल. त्यासाठी कोळशाचे प्रचंड साठे प्रकल्पस्थळी असतील. कोळशाच्या अजस्त्र साठयामुळे प्रदूषित झालेले पाणी जांभ्या दगडातून मुरून, ओहळात शिरून परिसरातील पाण्याचे स्त्रोत दूषित बनतील. आयात कोळसा वापरला तरी रोज सुमारे सात हजार टन राख तयार होईल. म्हणजे दरमहा दोन लाख टन राखेच्या साठयातून प्रदूषित पाणी जमिनीत मुरून आसमंतातील विहिरी, तळी, ओढे यांचे पाणी प्रदूषित होईल. उडती राख (ऋश्रू रीह) तर वाऱ्याबरोबर दूरवर पसरेल. परिणामी ४०/५० किलोमीटर परिसराला त्याचा धोका पोचेल. वाफेच्या लोटांमुळे आद्र्रता वाढेल. रोज १ लाख टन कार्बन डायऑक्साईड हवेत सोडला जाईल व तो परिसरात साठून तापमान वाढेल. प्रदूषित वायूतील सल्फर डायऑक्साईडमुळे पाने पिवळी पडतील. पिके करपतील. हिवाळ्यात दव आणि सल्फर डायऑक्साईड एकत्र आल्याने ॲसिडचा शिडकावा पडेल. हाच मोहोर येण्याचा हंगाम असल्याने आंब्याची उत्पादकता व गुणवत्ता खालावेल. नायट्रोजन ऑक्साईडस्मुळे ओझोन व नॅट्रेटस् तयार होतात. ओझोनमुळे पीक उत्पादन घटते. नायट्रेटमुळे पाण्यात शेवाळे (रश्रसरश) फोफावून वनस्पतीतील विविधता कमी होते आणि मासे मारले जातात. याशिवाय सूक्ष्मकण, (रिीीळर्लीश्ररींशी) उडती राख आणि अरसेनिक, केडियम, क्रोमियम, पारा (ाशीर्लीीू), डायऑक्सिन असे विषारी घटकही हवेत सोडले जातील. पारा पाण्यात मिसळून जिवाणू त्याचे विखारी मिथिल मरक्यूरीमध्ये रूपांतर करतात. आणि ते माशाच्या शरीरात साचून माणसाच्या सेवनात आल्यास घातक ठरते. अरसेनिक, पारा आदी विखारी घटक हवेतून व जमिनीतून पाण्यात मिसळून पिण्याचे पाणी दूषित बनते. भातखाचरांमध्ये अरसेनिक पोचले तर ते भाताच्या रोपांव्दारा तांदुळातून मानवी सेवनात आल्यास घातक ठरू शकते. पानावर साठलेली राख झाडाच्या प्रकाश संश्लेषण कार्यात आणि आंब्याच्या मोहोरावर बसणारी राख परागीकरणाच्या कार्यात अडथळा आणेल. हिवाळ्यात धुक्यामुळे आंब्याच्या मोहरावर रोगांचा हल्ला होऊन उत्पादन घटेल. या महाकाय प्रकल्पातील सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईडज्, कार्बन डायऑक्साईड आदी वायूंच्या प्रचंड उत्सर्जनामुळे आम्ल पावसाची बाधा परिसरातील जंगलसंपत्ती, शेते, बागा, किनाऱ्यावरील झाडेझुडपे यांना होऊन पीक उत्पादन घटेल, माती दूषित

झाल्यानेही उत्पादन कमी होईल व पाणी दूषित होईल.

४००० मे.वॉ. क्षमतेच्या औष्णिक प्रकल्पासाठी समुद्रातून दररोज चाळीस कोटी लिटर पाणी खेचले जाईल व गरम सांडपाणी समुद्रात फेकले जाईल. हे पाणी खाडीचे मुख व किनारपट्टीवर पसरेल. शिवाय हे प्रकल्प आयात कोळशावर अवलंबून असल्याने मोठी मालवाहू जहाजे व अन्य सागरी वर्दळ वाढून समुद्रात तेल व वगंणाचे प्रमाण वाढेल. किनारपट्टी व खाडया येथील खारफुटी व इतर वनस्पतीसंपदा नष्ट केली जाऊन किनाऱ्याचे संरक्षण नाहिसे होतील. तसेच मासे व इतर जलचर यांच्या प्रजननाच्या जागा नष्ट होऊन ही सागरी संपत्ती धोक्यात येतील. त्यावर अवलंबून असलेल्या मच्छीमारांच्या निर्वाहावर गदा येईल. अशा या विनाशकारी औष्णिक प्रकल्पाच्या विरोधात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जनतेने प्रखर आंदोलन छेडून हा प्रकल्प रोखून धरला आहे. मुंबई येथेही देवगड तालुका विकास आणि संघर्ष समिती प्रकल्प विरोधात क्रियाशील आहे.

फिनोलेक्स : फिनोलेक्स इंडस्ट्रीज या कंपनीचा पीव्हीसी पाईप तयार करण्याचा कारखाना रत्नागिरी तालुक्यात गोळप-रनपार-पावसच्या दशक्रोशीतील जनतेला प्रदूषणाने हैराण करीत आहे. फिनो‍ेलेक्स प्रकल्पामुळे गोळप, वायंगणी, रनपार येथील पिण्याचे पाणी दूषित झाले आहे. आणि खाडीमध्ये प्रदूषण पोचून रनपार परिसरातील मत्ससंपत्ती धोक्यात आली. त्यात भर म्हणजे कारखान्यासाठी वीजनिर्मितीच्या नावाने औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प (उरींिर्लीश ेि ुशी श्रिरपीं) उभारण्याचे काम फिनोलेक्सने हाती घेतले. (प्रारंभी २२ मे.वॉ., वाढीव क्षमता ४३ मे.वॉ.) फिनोलेक्सच्या कारखान्यातील प्रदूषणामुळे त्रस्त झालेल्या गोळप, पावस, रनपार दशक्रोशीतील जनतेमध्ये विरोधाची तीव्र लाट उसळली. त्यांनी १६ एप्रिल २००७ पासून लोकशाही मार्गाने विरोध चालू केला. अखेर १५ ऑगस्टला मंत्र्यांबरोबर बैठक झाली. व कंपनीच्या बांधकामाला स्थगिती देण्यात आली. परंतु तरीही कंपनी बांधकाम रेटतच आहे आणि जनतेचा झगडा चालू आहे. फिनोलेक्सतर्फे रनपार येथे वर्षभर वापरता येईल अशी बंदर सुविधा विकसित करण्यात येत आहे. फिनोलेक्स केबलची तेथे औष्णिक वीज प्रकल्प हाती घेण्याची योजना आहे.

महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर २००० मध्ये कोकणच्या मत्स्य व्यवसायाच्या विकासाच्या दृष्टीने ७ बंदरे व १९ जेटीची कामे पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. त्यापोटी ११ कोटी खर्चास मान्यता दिली. त्यामध्ये पावस (रनपार), जि. रत्नागिरी येथील जेटीचा समावेश आहे. परंतु फिनोलेक्स इंडस्ट्रीजने मार्च २००६ मध्ये दिवाणी दावा दाखल करून मच्छिमारी जेटी व आनुषंगिक काम करण्यास न्यायालयाकडून मनाई आदेश जारी केला. फिनोलेक्सच्या ऊर्जाप्रकल्पास जनआंदोलनाच्या रेटयाखाली शासनाने स्थगिती दिली तरी फिनोलेक्स काम पुढे रेटत आहे आणि मच्छिमारी सुविधा विकसित करण्याचा शासनाचा प्रकल्प मात्र एका खाजगी कंपनीच्या हितसंबंधासाठी बंद ठेवण्यात आला आहे. यावरून तथा-कथित लोकशाही शासन

कोणाच्या हितासाठी सत्ता वापरते हे उघड होते. जनता मत देते, पण कंपन्या निधी पुरवतात. जनतेने बहिष्कार टाकला तरी होयबांच्या मुठभर मतांच्या आधारावरही सत्ता पटकावता येते (कितीही कमी मतदान झाले तरी त्यातील बहुमत ज्याला मिळते तो निवडून येतो. अन्य काही देशांप्रमाणे किमान मतांची अट भारतात नाही.) परिणामी जनतेच्या मताला किंमत काय?

जिंदाल : जयगड-धामणखोल परिसरात नांदिवडे येथे जिंदाल कंपनी १२०० मे.वॉ. क्षमतेचा औष्णिक ऊर्जा प्रकल्प आणि आयात कोळसा उतरवून घेण्यासाठी जेटी बांधत आहे. १९९३ साली जिंदाल कंपनीने पोलादाच्या कारखान्यासाठी जमीन ताब्यात घेतली होती. ती जमीन औष्णिक प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहे. (सुमारे ६४० हेक्टर जमीन) या औष्णिक प्रकल्पामुळे मच्छीमारीवर गदा येणार आणि आंबा, नारळी, पोफळी आदी बागांचे मोठे नुकसान होणार म्हणून मच्छीमार, शेतकरी, फळ बागायतदार आदींनी या प्रकल्पाविरोधात रत्नागिरी जिल्हा जागरूक मंच स्थापन करून जोरदार आंदोलन उभारले. परंतु जुलुम जबदरस्ती व दडपशाही करून शासन जिंदाल प्रकल्प रेटत आहे. प्रकल्पाच्या सोयीसाठी जयगडपासून रेल्वेमार्गासाठी पाहाणी चालू आहे. जयगड येथील जेटीचा वापर अन्य खाजगी कंपन्यांमार्फत मालाची चढ-उतार करण्यासाठीही केला जाणार आहे. आज फिनोलेक्सच्या रनपार येथील जेटीचा असा वापर चालूच आहे. जिंदाल प्रकल्पानजिक लावगण येथे चौगुले शिपिंग कंपनीमार्फत बंदर विकासाची योजना आहे. तेथे बांधलेल्या जेटीवरून यंदाच्या वर्षी येथून सुमारे दोन लाख टन बॉक्साइटची निर्यात करण्यात आली. बंदराच्या जोडीला जहाज दुरुस्ती प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यात सुमारे १५० कुशल/अर्धकुशल रोजगार निर्माण होईल.

जयगड नजिक धामणखोल हे कोकणचे किनार पट्टीवरील सर्वात सुरक्षित नैसर्गिक बंदर मानले जाते. या टापूवर जिंदाल कंपनीचा अंमल प्रस्थापित झाल्याने मच्छीमारांच्या चलनवलनावर निर्बंध येण्याचा धोका आहे. जयगड बंदराच्या परिसरात मच्छिमारांची अनेक खेडी आहेत. किनाऱ्याजवळ उथळ पाण्यात भरपूर मासे मिळत. दाभोळपर्यंत मासेमारी चालत होती. पण दाभोळ वीज प्रकल्प सुरू झाल्यावर मत्स्य उत्पादन घटले. २००१ मध्ये प्रकल्प बंद झाल्यावर परिस्थिती सुधारली होती. शिवाय बंदरविकासासाठी खारफुटीचे जंगल तोडले जाईल, मूल्यवान प्रवाळ खडकांना धक्का पोचेल. माशांच्या प्रजननाच्या जागा धोक्यात येतील. धक्का बांधणी, वाळूचे बांध हलवणे, मोठया जहाजांची वर्दळ व तेल/वंगणाचे थर यामुळे मत्स्य उत्पादनावर विपरीत परिणाम होईल. एक/दोन कंपन्यांची भरभराट, त्यामध्ये अगदी मर्यादित नोकऱ्या यासाठी केवढी मोठी किंमत कोकणातील मच्छीमार, शेतकरी, बागायतदार व अन्य श्रमिक यांच्यावर लादली जात आहे याचा विचार करायला शासन तयार नाही. विकासाच्या नावाने विनाशाचा बुलडोझर फिरवला जातो आहे. या सर्व प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या हवा व जल प्रदूषणाचा एकत्रित विचार केलाच जात नाही.

शिवाय किनारपट्टी प्रदेश नियमनाचे (उठन ीशर्सीश्ररींळेपी) उल्लंघनही केले जात आहे.

रिलायन्सचा ५०० मे.वॉ. क्षमतेचा कोळशावर चालणारा औष्णिक विद्युत प्रकल्प डहाणू येथे आहे. प्रकल्पातील घातक उत्सर्जनामुळे डहाणू तालुक्यातील चि,ू$चे उत्पादन घसरले असल्याचे तसेच चि,ू$ व भाजीपाल्याची गुणवत्ता उतरल्याचे अनुभवास येत आहे. शिवाय मत्स्य उत्पादन कमी झाल्याच्याही तक्रारी आहेत.

कोळसा आधारित औष्णिक वीज प्रकल्पामुळे प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेल्या जनतेच्या आरोग्यावर होणारे संभाव्य दुष्परिणाम/अपाय तक्ता १ मध्ये दर्शवले आहेत. हवेतून श्वसनाव्दारे, त्वचेतून, पाण्यातून व मासे आदी खाद्यातून, प्रदूषणाचे घातक परिणाम घडतात. प्रदूषणाची मात्रा, वारंवारता, व्यक्तीची प्रकृती, वय अशा विविध घटकांवर बाधा होण्याची संभाव्यता अवलंबून असते.

माणसांप्रमाणेच पाळीव जनावरे, जंगली प्राणी, पक्षी, मासे या सर्वांना प्रदूषणाची बाधा संभवते. परिणामी प्राणी, पक्षी, व वनस्पती संपत्ती यातील नैसर्गिक विविधता धोक्यात येईल. कोकणामध्ये सह्याद्रीच्या माथ्यापासून ते पायथ्यापर्यंत आणि समुद्रकिनारी वैविध्यपूर्ण व समृध्द अशी निसर्ग संपदा आहे आणि मानव निर्मित आंबा, काजू, नारळ, सुपारी, फणस, आमसूल, आवळे, औषधी वनस्पती, मसाल्यांच्या वनस्पती आणि भात, वरी, नाचणी, वाल, भाजीपाला आदी पिके घेतली जातात. या सर्वावर औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांचा घातक परिणाम संभवतो.

### तक्ता १ : कोळसा आधारित औष्णिक प्रकल्पातील प्रदूषणाचे आरोग्यावरील संभाव्य दुष्परिणाम

| | लागोलगतचे (ीहेीीं ीशीा) | | दूरगामी (लहीेपळल) |
|---|---|---|---|
| सल्फर डायऑक्साईड | | फुफ्फुसाचा दाह, दमा, | फुफ्फुसाच्या कार्यक्षमतेचा |
| | जन्मजात वजन कमी | ऱ्हास, अकाली मृत्यूशी संबंध | |
| नायट्रोजन ऑक्साईड | | मुलांना श्वसनाचे आजार | फुफ्फुसाचे आजार |
| पार्टिक्युलेट मॅटर | दमा, हृदय विकाराचा झटका | न्युमोनिया, हृदयविकार, | |
| | | फुफ्फुसाचे आजार, अकाली मृत्यू | |
| हायड्रोजन फ्लोराईड | | फुफ्फुसात पाणी, तीव्र दाह | मूत्रपिंड व यकृतास बाधा |
| अरसेनिक | पचनसंस्था व मज्जासंस्थांना | फुफ्फुस, यकृत, त्वचा यांना | अपाय |
| कर्करोगाचा गंभीर धोका | | | |
| कॅडमियम | श्वासनलिका, फुफ्फुसाचा दाह | श्वासनलिका दाह[१], फुफ्फुसाचा आजार | |
| क्रोमियम | मूत्रपिंडाला धोका[१] आणि ◌ | कर्करोगाचा गंभीर धोका | |
| | अंतर्गत रक्तस्राव | | |

| | | |
|---|---|---|
| मर्क्युरी | पचन, श्वसन व मज्जासंस्थांवर दुष्परिणाम | बाधित मातांच्या बालकांच्या मज्जेस अपाय, मूत्रपिंडाला बाधा |
| डायऑक्सिन | मज्जासंस्थेवर दुष्परिणाम, रोगप्रतिकारशक्तीचा ऱ्हास, मज्जा व प्रजननसंस्थेस बाधा | गर्भाच्या वाढीवर दुष्परिणाम, जठर, यकृत यांना कर्करोगाचा गंभीर धोका, मधुमेहाचा धोका |

संदर्भ : *ढहश एपींळीेपाशपींश्र खारिलींी ेष उेरश्र*, Gीशशपशिरलश इीळशषळपस, लश्रळारींश, छशु Zशरश्ररपव, गरपींरीू २००५, . २–४

([1] जास्त मात्रा मिळाल्यास)

जैतापूर आण्विक वीजप्रकल्प : न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यातील जैतापूरनजिक माडबन येथे अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे ठरवून त्याची कार्यवाही जानेवारी २००६ मध्ये सुरू करण्यात आली. त्यासाठी माडबन येथील ७०२ हेक्टर आणि निवेली, करेल व मिठगव्हाणे येथील २७९ हेक्टर जमीन सक्तीने संपादन करण्याची कारवाई चालू आहे. १००० मे.वॉ. क्षमतेच्या दोन युनिट्स्ना केंद्र शासनाने परवानगी दिलेली आहे. तेथे एकूण ९६०० मे.वॉ. क्षमता उभारण्याची योजना आहे.

अणुवीज प्रकल्प म्हणजे किरणोत्सर्गाच्या महाभीषण संकटाशी खेळ ! किरणोत्साराच्या बाधेमुळे गर्भपात, जन्मजात विकृती, कर्करोग वाढण्याचा धोका असतो. मासे, प्राणी व वनस्पतीवर घातक परिणाम होतो. शिवाय आण्विक वीजनिर्मिती फार महाग पडते. अमेरिका, युरोपातील जागृत लोकमतामुळे तेथे नवे अणुऊर्जा प्रकल्प उभारता येत नाहीत. तेव्हा लोकमत दडपून टाकता येते अशा भारतासारख्या विकसनशील देशांची बाजारपेठ अणुऊर्जा निर्मिती सामग्री व इंधन खपवण्यासाठी अमेरिकी/युरोपीय बडया कंपन्या काबीज करण्याच्या खटपटीमध्ये आहेत. टाटा-रिलायन्स सारख्या बडया भारतीय कंपन्याही त्यांच्याशी हातमिळवणी करून आहेत. त्यासाठी अमेरिका-भारत नागरी अणु सहकार्य करार विचाराधीन आहे. सध्या हा करार वादग्रस्त आहे. पण काँग्रेस शासन एवढे अमेरिकेच्या मुठीत आहे की काही झाले तरी तो करार संमत करायचा व अणुऊर्जा प्रकल्प मोठया संख्येने भारतात उभे करायचे असे काँग्रेसने ठरवले आहे. त्यामुळे अणुसहकार्य करारालाही विरोध करणे गरजेचे आहे. कारण त्यामुळे भारताचे मिंधेपण वाढत आहे आणि स्वायत्तता, स्वयंनिर्भरता गमावली जात आहे. शिवाय जर तो करार संमत झाला तर भारतात अनेक नवे अणुऊर्जा प्रकल्प उभे राहून हजारोंचे संसार धुळीला मिळतील.

माडबन परिसरातील शेतकरी, मच्छिमार, बागायतदार, व्यापारी आदींनी जनहित सेवा समिती स्थापन केली आहे आणि २००६ पासून अणुऊर्जा प्रकल्पाला प्रखर विरोध करून भूसंपादनाची कारवाई रोखून धरली आहे.

देशासाठी त्याग? : कोळसा आधारित व आण्विक वीजप्रकल्प एवढे घातक व विनाशकारी असले तरी देशासाठी कोकणने त्याग करायला तयार व्हावे असा दावा केला जातो. येथे प्रश्न उपस्थित होतो की देश म्हणजे कोण? देशातील जनता की मॉंसेंटो, कारगील, टाटा, बिर्ला, अंबानी आणि त्यांच्याशी हातमिळवणी केलेले येथील राज्यकर्ते? दुसरा प्रश्न, विजेची तूट का पडत आहे? महाराष्ट्रात तर ती एन्रॉनमुळेच निर्माण झाली. तिसरा प्रश्न विजेची गरज म्हणजे काय? मुंबई, पुणे, दिल्ली, बंगलोर आदी महानगरांमधील झगमगते मॉल्स, मल्टिप्लेक्स, आलीशान वातानुकूलीत कचेऱ्या आणि निवासस्थाने, जाहिरातबाजी यासाठी होत असलेली विजेची प्रचंड उधळपट्टी ही भारताची विजेची ''गरज" होऊ शकते? आज विजेची उधळपट्टी थांबवून आणि कपॅसिटर बसवून व कार्यक्षम उपकरणे, मोटारी, दिवे आदी वापरून वीज बचतीच्या मार्गाने अणु वीजनिर्मिती केंद्र उभारण्याच्या खर्चाच्या केवळ १०-१५ टक्के खर्चात ३० ते ३५००० मे.वॉ. क्षमता उपलब्ध होईल. शिवाय भारतासारख्या निसर्ग-समृध्द देशाला जलविद्युत, पवन, जैवऊर्जा आणि भवितव्यातली गरज भागवण्यास मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेली सौरऊर्जा असे शाश्वत, स्वच्छ ऊर्जा स्रोत उपलब्ध असताना अणुऊर्जेसारख्या अतिखर्चिक व घातक ऊर्जास्रोताचा विचारही करणे लोकहित विरोधी आहे.

प्रदूषणाचा व तापमान वाढीचा बागुलबुवा उभा करून अणुऊर्जेचे समर्थन केले जाते आहे. परंतु असा दावा करताना युरेनियम खाणकामापासून, अणुभट्टी उभारणीपर्यंतच्या प्रक्रियेमध्ये तसेच किरणोत्सारी अणुकचऱ्याचे साठे सांभाळणे आणि त्याची कायमची विल्हेवाट लावणे, आण्विक केंद्र बंद करताना किरणोत्साराने प्रदूषित अशा टनावारी मालाची सुरक्षित व्यवस्था लावणे या सर्व टप्प्यांवर प्रदूषणाची फार मोठी भर पडते, हे विसरले जाते. शिवाय आण्विक वीजनिर्मिती व आण्विक कचरा यामुळे होणाऱ्या किरणोत्साराच्या धोक्याकडे दुर्लक्ष केले जाते. किरणोत्साराचा दुष्परिणाम केवळ बाधित व्यक्तीच्या आयुष्यापुरता मर्यादित नसतो तर तो पिढयानुपिढया विकृती निर्माण करू शकतो हा दूरगामी घातक परिणाम नजरेआड करणे म्हणजे पुढील पिढयांवर मोठा अन्याय होय. (तपशिलासाठी पाहा परिशिष्ट - १ : १. महाराष्ट्रातील वीज पुरवठयाचा प्रश्न, २. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प)

बंदरे : कोकण किनारपट्टीवरील ४२ लहान मोठी बंदरे सागरी मालवाहतूक व प्रवासीवाहतूक यासाठी महत्वाची होती. परंतु जंगलातोडीमुळे बंदरे गाळाने भरली व दुर्लक्षित राहिली. रस्ते व पुढे रेल्वे सुविधा विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले. कोकणविकास योजनेअंतर्गत तेरा बंदराचा विकास प्रस्तावित होता पण एकच योजना पुरी झाली. १९९१ नंतर नव्या जागतिकीकरणाच्या जमान्यात खाजगी कंपन्यांबरोबर बंदर विकासाचे करारमदार होऊ लागले. रागयडमधील रेवस, दिघी, रत्नागिरीतील जयगड व सिंधुदुर्गमधील विजयदुर्ग व रेडी या बंदरांच्या विकासासाठी खाजगी कंपन्यांबरोबर शासनाने करार केले

आहेत. त्यात १० हजार कोटी रुपये गुंतवणुकीची अपेक्षा आहे. या बंदरातील सुविधा व जरूर ती जमीन संपादित करून खाजगी कंपन्यांना बहाल करण्याचे आश्वासन आहे. शिवाय किनारपट्टीवर कृत्रिम झिंगे उत्पादनाला उत्तेजन देऊन शेती व मासेमारीवर संकट येत आहे.

पर्यटन : ताज, ओबेराय शेरेटन, फोमेंटो आदी बडया कंपन्यांना पंचतारांकित हॉटेले उभारण्यासाठी सक्तीने जमीन ताब्यात घेऊन कोकणच्या समुद्र किनाऱ्यांचे  व्यापारीकरण व खासगीकरण करण्याच्या योजना आहेत. हॉटेल, कॅसिनो आदी पंचतारांकित पर्यटन विकसनाच्या दृष्टीने जलविहारासाठी ऊबदार, स्वच्छ समुद्र,'सन टॅनिंगसाठी'उन्हात पहुडण्याकरता विस्तीर्ण चौपाटया आणि झिंगे, माशांचे चवदार जेवण. गोव्याप्रमाणेच परकीय पर्यटकांसाठी स्वर्गच!  भारतभूमी ही भारतीय कष्टकऱ्यांची नसून, जणू बलाढय परकीय-देशी कंपन्यांच्या नफेखोरीसाठी आणि श्रीमंत पर्यटकांच्या विलासी चैनचंगळीसाठी आहे असे गृहीत धरून परकीय कंपन्यांना भारतात आर्थिक साम्राज्य स्थापनासाठी निमंत्रित करण्यात येत आहे. हे सर्व कोकणच्या विकासाच्या गोंडस नावाने आणि नोकऱ्या मिळतील अशा भूलथापा देऊन ! भारतीय राज्यकर्ते व नोकरशाही बडया देशीविदेशी कंपन्यांचे दास बनले आहेत ! आर्थिक गुलामगिरीएवढीच ही मानसिक गुलामगिरीही देशविघातक आहे.

बॉक्साईट : कोकणात बॉक्साईट विपुल प्रमाणात पसरलेले आहे. याशिवाय सिंधुदुर्ग जिल्ह्यात लोखंड, अल्युमीनियम, मँगानीज, इल्मेनाईट ही खनिजे सापडतात. ही देशाची खनिज संपत्ती देशांतर्गत उपयोगासाठी जरूरीप्रमाणे वापरण्याकरता सांभाळली पाहिजे. त्याऐवजी किरकोळ रकमेत ती निर्यात केली जात आहे. हे धोरण बदलणे आवश्यक आहे. बॉक्साईटच्या खाणी ठिकठिकाणी पसरल्या आहेत. त्यापायी पर्यावरणीय निकष धुडकावले जात आहेत. या खाणींमुळे आंब्याच्या बागांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी आहेत. खाणमालकांच्या तात्पुरत्या नफ्यासाठी कोकणची निसर्गसंपत्ती व फळबागा यांचे कायमचे नुकसान केले जात आहे. कोकणमध्ये बंदर विकास, खाणी, कारखाने, वीजनिर्मितीकेंद्रे असे कोणतेही प्रकल्प संमत करण्यापूर्वी शासनाने स्थानिक जनतेची निर्वाह साधने हिरावून घेतली जाणार नाहीत, ग्रामपंचायतीची संमती आहे ना आणि पर्यावरणीय समतोल राखला राखला जाईल हे पाहिजे. प्रत्येक प्रकल्पाबाबत सुटासुटा नव्हे तर सर्वांचा एकत्रित विचार करून कोकणच्या निसर्गाचे व फळबागा, शेती, मत्स्यसंपत्तीचे उध्वस्तीकरण टाळले पाहिजे.

## कोकण किनारपट्टीचे औद्योगीकरण व व्यापारीकरण विशेष घातक का?

आधुनिक बंदरे, वीजप्रकल्प, रिफायनरी, मोठे कारखाने, पंचतारांकित हॉटेले, झिंगेसंवर्धन प्रकल्प, पश्चिम किनारी सागरी महामार्ग, विमानतळ असे अनेकविध प्रकल्प कोकणच्या किनारपट्टी प्रदेशात उभे राहात आहेत. किनारपट्टीवरील बांधकामांमुळे पर्यावरणीय असमतोल व प्रदूषणवाढ होऊन दूरपल्ल्याचे गंभीर

दुष्परिणाम संभवतात. म्हणून १९ फेब्रुवारी १९९१ रोजी केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने समुद्रभरतीच्या रेषेपासून ५०० मीटर अंतरापर्यंत बांधकाम व इतर हस्तक्षेप यांचे नियंत्रण करण्यासाठी एक अधिसूचना जारी केली. त्यातील निर्बंध वरील अनेक प्रकल्पांमुळे मोडले जाऊन घातक परिणाम संभवतात. त्याचे स्वरूप थोडक्यात पाहू.

बंदरविकास करताना खोल समुद्रात खणून व भर घालून धक्के ऊभे केलेले आहेत, के$ले जात आहेत. त्याचा दुष्परिणाम प्रवाळ व इतर समुद्रजीव आणि माशांच्या प्रजननच्या जागा यावर होतो आहे. मोठे टँकर्स, मालवाहू जहाजे व यांत्रिक मच्छीमारी जहाजे यांची वर्दळ वाढत आहे. परिणामी समुद्रात वाहून जाणारे तेल व वंगण याचे प्रमाण वाढत जाऊन माशांना श्वासोच्छवास करणे कठीण होते. धक्का बांधणीमुळे सागरातील प्रवाहांवर काय परिणाम होईल, सध्याचे वाळूचे बांध (ीरपव लरीी) कसे हलतील, नवीन कोठे तयार होतील, पाण्याचा फुगवटा कोठे पसरेल या गोष्टींचा अभ्यास न करता खाजगी कंपन्यांचे धक्के बांधण्याचे काम चालू आहे व त्यामुळे गुंतागुंतीच्या समस्या उभ्या राहात आहेत.

किनारपट्टीनजिक पठारावर कारखाने व वसाहती उभ्या राहात आहेत. त्यासाठी संपूर्ण जंगलतोड व सपाटीकरण केले जाऊन पठारावरचा मातीचा थर वाहून जांभा दगड उघडा पडत आहे. या खडकात पाणी झपाटयाने मुरते व निचरून जाते. त्यामुळे अशा उघडया पठारावर गवताशिवाय कोणतीही वनस्पती जगणे कठीण आहे. परिणामी कारखान्यांच्या वाढीमुळे समुद्र किनाऱ्यावरील हिरव्या पाचूच्या पठारांचे वाळवंटीकरण होत आहे.

कारखान्यातून बाहेर पडणारे पाणी व सांडपाणी ओढे, नद्यांत वाहून त्या प्रदूषित झाल्या आहेत. हे प्रदूषित पाणी खाडयांमध्ये वाहत जाते. खाडयांलगतची खारफुटीची जंगले व त्यालगतचे चिखलाचे पट्टे हे सागरी मासे व इतर जलचर यांच्या प्रजननाच्या जागा आहेत. खाडयांमध्ये प्रदूषित पाणी शिरल्याने मासे व इतर सजीवांच्या प्रजननावर विपरित परिणाम होत आहे. दाभोळ आणि रत्नागिरीजवळील खाडयांमध्ये असे दुष्परिणाम जाणवू लागले आहेत. सांडपाणी, मैलापाणी यातील अन्नांश व रसायने यामुळे पाण्यात विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण कमी होऊन वनस्पती व माशांवर अनिष्ट परिणाम होत आहेत. कारखान्यातून बाहेर पडणारी गरम हवा व दूषित वायू, आम्ल पाऊस यांचा दुष्परिणाम आंबा, सुपारी, नारळ अशा मौल्यवान पिकांवर होऊन फळांचे उत्पन्न कमी होणे, फळे आतून सडणे यामुळे नुकसान होत आहे. कोकणची जमीन निचऱ्याची असल्याने सांडपाणी व कचरा यामुळे विहिरींचे पाणी दूषित होते. त्यामुळे खेडोपाडी रोगराई पसरत आहे.

कोकणची जंगले ही सदाहरित दुर्मिळ वृक्ष, वेली व वनस्पती यासाठी विख्यात होती. त्यामध्ये कित्येक औषधी वनस्पती, वेतासारखी अत्यंत उपयुक्त वनस्पती आढळतात. येथील वनस्पतीतील विपुल जैविक

विविधता हा जनुकांचा अमुल्य ठेवा नवनवीन जाती विकसित करण्यासाठी पायाभूत आहे. जंगल तुटले आणि तेथील विविधता संपली की सदाहरित वृक्ष वाढत नाहीत. जंगलाचे छत नष्ट झाले की, तेथे खुरटी वाढ फक्त होते. तेथील कीटक, सरपटणारे प्राणी, पक्षी नाहीसे होऊ लागतात. कोकणची सदाहरित जंगले तुटल्याने ३५ पक्षीजाती नाहीशा झाल्याचे अभ्यासकांना आढळले आहे.

जंगले तुटल्यामुळे डोंगरातले झरे व प्रवाह आटले आहेत व पाण्याचे दुर्भिक्ष वाढत आहे. त्यात भर पडते आहे नवीन कारखाने, वसाहती, हॉटेले यामुळे पाण्याच्या मागणीतील प्रचंड वाढीची. किनारपट्टीवरील वीजनिर्मिती केंद्रे, हॉटेले, कारखाने पाणीपुरवठयासाठी कूपनलिका, विहिरी खणून भू-जलाचा बेछूट उपसा करीत आहेत. हा वेग पुनर्भरणाच्या वेगाहून अधिक होऊन खारे पाणी भू-जलात शिरत आहे. परिणामी गावचा पाणीपुरवठा खारट होऊन गावकऱ्यांच्या हातचे पिण्याचे पाणीसुध्दा हिरावले जाते आहे.

किनारपट्टीवरील पुळणींचा वापर पंचतारांकित व्यापारी पर्यटनासाठी करण्यास उत्तेजन दिले जाते आहे. हॉटेले व इतर बांधकामांमुळे नैसर्गिक प्रवाहाला अडथळे निर्माण होत आहेत. किनारपट्टीवरील खारफुटी व इतर वृक्षसंपदा नष्ट केली जाते आहे. कचरा, टाकाऊ पदार्थ, सांडपाणी यामुळे खाडया, समुद्रकिनारे प्रदूषित होत आहेत. मुंबई ते रेवदंडा, हरिहरेश्वर, गणपतीपुळे, मालवण येथे पर्यटनाचे विपरित परिणाम जाणवू लागले आहेत. मोटारींसाठीच्या रस्त्यांच्या वाढीमुळेही किनारपट्टीचा विध्वंस होत आहे.

समुद्रकिनाऱ्यावरील कोळंबी, झिंगे यांच्या कृत्रिम संवर्धन प्रकल्पास शासन उत्तेजन देते आहे. आंध्र प्रदेशामध्ये अशा प्रकल्पांचे मोठे दुष्परिणाम अनुभवास येत आहेत. झिंगे प्रकल्पासाठी किनारपट्टीवर बंधारे बांधून कृत्रिम तळी निर्माण करून त्यात समुद्राचे पाणी भरले जाते. त्यासाठी पंप, पंप घरे, पाईपलाईन आदी बांधकामासाठी किनारपट्टीवरील खारफुटी व इतर वृक्षसंपदा नष्ट केली जाते. बांधकामांमुळे नैसर्गिक प्रवाहांना अडथळे निर्माण होतात. खारे पाणी तळ्यात भरल्याने आसमंतातील जमीन व पाणी खारावते. झिंगे उत्पादनासाठी वापरात येणाऱ्या रसायनाच्या प्रदूषणाने किनारपट्टी, मच्छिमारी व शेती यांचे असे अपरिमित नुकसान होते.

कोकणपट्टीचे औद्योगीकरण व नागरीकरण केल्याने वाढते प्रदूषण, वाढती गर्दी व गोंगाट, वाढती महागाई व झटपट पैशाने निर्माण होणारी व्यसने या सर्व समस्या वाढत आहेत. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तगत केल्याने शेतकरी देशोधडीला लागत आहे. कोकण किनारपट्टीची समृध्द मत्स्य व इतर जलचर संपत्ती आणि तेथील मौल्यवान फळबागा व वृक्षसंपदा यांचे वैशिष्टय व वैविध्य विचारात घेऊन कोकणच्या संरक्षणास खास अग्रक्रम देणे जरूर आहे. पर्यावरण खात्याने काढलेल्या किनारपट्टी रक्षणविषयक अध्यादेशाचा तोच हेतू आहे. पण पर्यावरण संतुलन, लोकांचा निर्वाह व लोकसंस्कृती या सर्वास मूठमाती देऊन सत्ता-संपत्तीधारकांच्या फायद्यासाठी कोकणची व्यापारी लूट चालू आहे.

रोजगाराचे आमिष... कारखानदारी वाढली की रोजगार वाढतो हे समीकरण एकोणिसाव्या शतकात ठीक होते. ब्रिटिशांनी रत्नागिरी जिल्ह्यातील भातशेती, जलवाहतूक आणि व्यापारउदीम प्रचंड जंगलकटाई करून नष्ट केले. तेव्हा पोटासाठी कोकणी माणूस मुंबईकडे वळला आणि तेथील कापड गिरण्यात, बंदरात चाकरीला लागला. अशिक्षित, बिगरकसबी माणूसही तेव्हा नव्या उद्योगधंद्यात घेतला जाई आणि कारखान्यामध्ये मोठया संख्येने कामगार लागत. परंतु दुसऱ्या महायुध्दानंतर तंत्रविज्ञानामध्ये वेगाने बदल घडत गेले. आणि गेल्या वीस वर्षात तर वाढते यांत्रिकीकरण व संगणकीकरण यामुळे कामगारांची गरज वेगाने घटत आहे. आजचे उद्योग एवढे भांडवलप्रचुर आहेत की ९२०० कोटी रुपये गुंतवणुकीच्या एनरॉन वीज प्रकल्पात फक्त ३०० लोकांना रोजगार, २०००० कोटी रुपये गुंतवणुकीच्या जैतापूर आण्विक ऊर्जा प्रकल्पात फक्त ७०० लोकांना रोजगार अपेक्षित आहे, आणि तोही उच्चशिक्षित, तंत्रकुशल लोकांना. त्यामुळे वीजप्रकल्प, रिफायनरी, रासायनिक उद्योग कोकणात उभे राहिले तर कोकणच्या माणसाला झाडूवाला, रखवालदार, माळी अशी थोडीच कामे मिळू शकतील. अभियांत्रिकी महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण सुविधा कोकणच्या तरुणासाठी खास कोकणमध्ये उभारल्या तरीसुध्दा एकूण रोजगारवाढ अत्यल्प असल्यामुळे उद्योगांच्या वाढीमुळे कोकणवासियांची विकासाबाबतची अपेक्षा पुरी होत नाही. कारण या उद्योगांचा कच्चा माल बाहेरून येतो व तयार मालाची बाजारपेठ बाहेरच असल्याने, थोडक्यात स्थानिक अर्थव्यवस्थेशी त्यांचे दुवे सांधलेले नसल्याने आर्थिक वाढीला उत्तेजन मिळत नाही. नोकरदार लोकांची संख्या अल्प असल्याने व्यापारउदीम व घरकाम आदी नोकऱ्यांमध्येही मर्यादितच वाढ होते; परंतु या मोठया उद्योगांची जमिनीची भूक मोठी असल्याने जमीन संपादनामुळे शेकडो शेतकऱ्यांची निर्वाहसाधने हिसकावून घेतली जातात. शिवाय हवा आणि पाणी प्रदूषणामुळे पिकांचे, मच्छीमारीचे नुकसान होते ते वेगळेच! त्यामुळे बाहेरून लादलेले उपरे भांडवलप्रधान उद्योग कोकणच्या विकासाला पोषक तर नव्हेच पण विनाशकारीच ठरत आहेत.

पर्यटन : पर्यटनामुळे रोजगार वाढेल असा भरवसा असतो; परंतु हे पर्यटन कोणत्या प्रकारचे आहे यावर त्यामधून रोजगार कशा प्रकारे वाढेल आणि पर्यावरणाला किती धोका पोचेल हे अवलंबून असते. पंचतारांकित पर्यटन हे श्रीमंत थरासाठी असल्याने त्यांच्या सरबराईसाठी उंची दारू, ब्रेकफास्ट सीरियल्स, पाव-बिस्किटे, डबाबंद मांस, फळफळावळ, मेवा, साबण, अत्तरी फवारे हे सर्व बाहेरूनच आणले जाते. पंचतारांकित हॉटेलात सफाईदार इंग्लिश बोलणाऱ्या मॉड तरुण-तरुणींना व अनुभवी खानसामे, सेवकांनाच फक्त नोकरीची संधी. कोकणवासीयांना अंगमेहनतीची गडी, माळी, मोलकरीण, चपराशी यापलीकडे कामे मिळणे कठीण. विलासी पर्यटकांबाबत गोव्यातला अनुभव आहे की कोवळ्या वयाची मुले, मुली, स्त्रिया यांना लैंगिक व्यवसायामध्ये ओढले जाते. श्रीमंत पर्यटन व्यवसायामध्ये पूर्वी जसे राजेरजवाडे, राजपुत्र यांच्या

सेवेसाठी दास-दासी गुलामासारखे वापरले जात, तेच नाते पर्यटक व सेवकांमध्ये असते. पर्यटक चैनी, अरेरावी, कधी दारू, अमली पदार्थांच्या धुंदीत तर चाकर नम्रपणे त्यांच्या हुकमाच्या तालावर नाचवले जातात ! हे नाते पर्यटक व सेवक दोहोंच्याही दृष्टीने घातक, अमानवी असते. शिवाय लैंगिक अत्याचाराचा धोका वेगळाच. अशा रीतीने जेव्हा पंचतारांकित पर्यटनाला शासन उत्तेजन देते तेव्हा त्याचे कोकणातील श्रमिकांवर, संस्कृतीवर काय दुष्परिणाम होतील आणि म्हणून अशा तऱ्हेच्या रोजगाराचे स्वागत करायचे का याचा गंभीर विचार होणे अगत्याचे आहे. दुसऱ्या प्रकारचे पर्यटन म्हणजे कृषी पर्यटन आणि शैक्षणिक सहली. शाळा, महाविद्यालयातील माफक उत्पन्नवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची सुट्टी-सहलीसाठी कोकणवारी. या पर्यटकांचा मुक्काम राहुटया, देवालये, धर्मशाळा किंवा घरोघरी आणि यजमानांशी नाते अतिथी म्हणून अगत्याचे-बरोबरीचे. कोकणातील पर्यटन विकास हा मनमुराद भ्रमण, निसर्गनिरीक्षण, निसर्ग-सौंदर्यास्वाद व शैक्षणिक सहलींना पोषक सोयी-सुविधा वाढवण्याच्या दृष्टीने केला पाहिजे. अशा सहलींत श्रमसहभागाचा वाटा उचलण्याचे आयोजन करता आले तर शेतकऱ्यांना मदतकारक होईल आणि विद्यार्थी-विद्यार्थ्यांना आगळा आरोग्यदायी अनुभव मिळेल.

तेव्हा परकीय व खाजगी बडया भांडवलाच्या कुबडया घेऊन आपणास उभे राहता येईल या भ्रमात न राहता विकासासाठी राष्ट्रीयीकृत बँका, नाबार्ड, व शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या भांडवलात, कल्पक व लोककेंद्री योजनांआधारे कोकणची शेती, फळबागा, मच्छीमारी यांच्या विकासासाठी झटले तर श्रमिक जनतेला उज्ज्वल भवितव्य आहे.

## प्रचलित लोकहितविरोधी विकासरीती व पर्यायी लोककेंद्री विकास धोरण

प्रचलित विकासरीती : आज विकासाची व्याख्या केवळ आर्थिक निकषावर केली जाते आणि त्याचे मोजमाप केले जाते ते वस्तू-सेवा निर्मितीची पट्टी लावून. राष्ट्रीय उत्पन्नाचा दर ८ टक्के-९ टक्के म्हणजे विकासाची दौड मानली जाते. या वाढत्या उत्पन्नाचे विभाजन कसे होते आहे, ते महापद्माधीश (लाख-कोटी), कोटयधीश यांच्या हातात वाढत्या प्रमाणात केंद्रित होते आहे की किमान जीवनमान गाठण्यासाठी कष्टकरी जनतेच्या हातात पोचते आहे, याचा विचार केला जात नाही. आर्थिक वाढीची गेली पंधरा वर्षे घोडदौड चालू असताना अजूनही भारतातील ७०% जनतेला रोजी २० रुपये खर्च करण्याएवढेही उत्पन्न मिळत नाही, कारण वाढत्या उत्पन्नाचे अतीव केंद्रीकरण होते आहे. श्रीमंतीचे वाढते केंद्रीकरण होत असल्याने उत्पादनाचे अग्रक्रमही त्यानुसार ठरत आहेत. उत्पादनामध्ये शस्त्रास्त्रे, चैनीच्या वस्तू, फालतू-घातक वस्तू यांचे प्रमाण वाढते आहे आणि धान्य, तेल, डाळी, घरे आदी जीवनावश्यक वस्तूंची तूट पडून श्रमिकांची ससेहोलपट वाढते आहे. एवढेच नव्हे तर प्रचलित ''विकासा"साठी सेझ, विमानतळ, खाणी, कारखाने, इ. उभारण्यासाठी जमीन, जंगलसंपत्ती, मत्स्यसंपत्ती अशी श्रमिकांची जगण्याची साधने हिरावून घेतली जात आहेत. आणि

लाखो श्रमिकांना देशोधडीला लावले जात आहे. जमिनीवरून, जंगलातून सक्तीने उचलबांगडीस शेतकरी-आदिवासी विरोध करीत आहेत. तेव्हा पोलीस-जुलूमजबरदस्ती-शस्त्रबळाचा वापर करून ''विकासा"चा बुलडोझर शासन रेटत आहे. कारण राज्यकत्र्या वर्गास-मंत्री-खासदार-आमदार, नोकरशाही, बडे उद्योगपती, व्यापारी, बडे जमीनमालक, बिल्डर, त्यांचे हस्तक व आश्रित, यांना त्यातून फायदा लाटता येतो. जनतेची निर्वाहसाधने हडप करून ती बडया उद्योग-व्यापारी-बिल्डरना बहाल करून त्यांचे नफे फुगवले जात आहेत आणि शासनकत्त्तर्यांचे खिसे त्यातून गरम होत आहेत. परंतु या विकासपध्दतीला विरोध फक्त जमीन-जंगल जे गमावत आहेत तेच करत आहेत. आज शेतकरी-आदिवासी जात्यात भरडला जातो आहे आणि मध्यमवर्गीय नागर जनता सुपात आहे. त्यांना त्याचे चटके फारसे बसत नाहीत. त्यामुळे तो थंड आहे.

प्रचलित विकासपध्दतीचे दूरगामी अनिष्ट परिणाम लक्षात घेणे गरजेचे आहे. त्याचे चटके कनिष्ठ मध्यमवर्गालाही आता जाणवायला लागले आहेत. शेतजमिनीचा वाढता नागरी वापर आणि फळे, फुले आणि निर्यातीला उत्तेजन देण्याच्या धोरणामुळे धान्याखालील क्षेत्र कमी होऊन धान्याचे भाव भडकले आहेत. कृषीमंत्री धान्य-डाळी-तेल आयात करण्याच्या आणि महागाई नियंत्रणात ठेवण्याच्या बाता करताहेत. परंतु आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गव्हाचे भाव वर्षभरात दुप्पट झाले आहेत, तेव्हा आयातीवर अवलंबून राहाणे कसे परवडणार? परकीयांना भारतात स्थावर मालमत्ता खरीदण्यास मुभा दिल्याने ५०-६० पट अधिक क्रयशक्ती असलेल्या परकीय कंपन्यांच्या अतिक्रमणामुळे व काळ्या पैशामुळे जमिनीचे भाव आकाशाला भिडले आहेत. परिणामी महानगरांमध्ये मध्यमवर्गालाही पक्का निवास न परवडण्याजोगा होऊन त्यांची परवड वाढते आहे.

रोजगारनिर्मिती?: परकीय गुंतवणूक व कारखानदारी यामुळे रोजगार वाढतो असा दावा करून प्रचलित विकास धोरणाचे समर्थन केले जाते. परंतु याबाबत वस्तुस्थिती काय आहे? १९९१ पासून आधुनिक उद्योग-खाणी-सेवा क्षेत्रातील प्रकल्पांवर सुमारे ११ लाख कोटीची गुंतवणूक झाली व १३ लाख कोटीची गुंतवणूक होऊ घातली आहे. परंतु या काळात संघटित क्षेत्रातील रोजगार सुमारे २७० लाख या पातळीवरच घोटाळत आहे. कारण नवे उद्योग प्रामुख्याने उच्चभ्रू वर्गासाठी उत्पादन करणारे, भांडवलप्रचुर व ऊर्जाप्रधान आणि स्वयंचलित व संगणक तंत्रज्ञान वापरणारे असल्याने मर्यादित नोकऱ्या देणारे-त्याही मुख्यत... उच्चशिक्षितांसाठीच-असे आहेत. त्यामुळे अल्प प्रमाणातच नवा रोजगार निर्माण होतो. पण त्याबरोबर कापड उद्योगातील रोजगारात मोठी घट झाल्याने ऐन रोजगार निर्मिती शून्य ! शिवाय या विकास धोरणाखाली शेतकरी व आदिवासी यांचे खच्चीकरण केले जात असल्याने बेरोजगारी मोठया प्रमाणात वाढते आहे ते वेगळेच.

विकासाचे फलित : विकासाच्या नावाखाली चाललेल्या झगमगाटाच्या भूलभूलय्याने न फसता त्याचे खरे

स्वरूप समजून घेतले पाहिजे. नव्या उद्योगांमुळे रोजगार निर्मिती फारशी होत नाही. एवढेच नाही तर त्या ऊर्जा प्रधान उद्योगांमुळे वीज निर्मिती, खाणींची गरज वाढून मोठया प्रमाणात भारतातील जंगले व अन्य निसर्गसंपत्तीचे उध्वस्तीकरण होत आहे आणि श्रमिकांची जमीन-पाणी-जंगल ही निर्वाह साधने हडप केली जात आहेत. प्रचलित आर्थिक वाढ ही अशी श्रमिक विरोधी व देशविघातक आहे. प्रचलित विकासरीती ही केवळ भांडवलप्रधान, अत्युच्च तंत्रज्ञानप्रधान आहे असे नव्हे तर ती विकासाचे एक घातक मूल्य, एक अनिष्ट 'आदर्श' समाजात रुजवत असते. 'खाजगी नफा' आणि उत्पादनांच्या राशी म्हणजेच विकास. विकासाचा एकमेव मार्ग म्हणजे बाजारयंत्रणा, ती काबीज करण्यासाठी मन बधीर करून टाकणारी आक्रमक जाहिरातबाजी, "सततचा उपभोग म्हणजेच सुख" या भ्रमावर स्वार होऊन चाललेली दौड म्हणजे विकास असा भ्रम निर्माण केला जात आहे. सट्टेबाजी वित्तव्यवहारामार्फत भांडवलाची हाताळणी, जीवघेणी स्पर्धा, निसर्गाचा ऱ्हास, कचऱ्याचे ढीग, प्रचंड प्रदूषण, शोषण या रूपात समाजावर मोठी किंमत लादून खाजगी नफ्याचे केंद्रीकरण करणारी ही विकासपध्दती माणसाचे माणूसपण मारून ''पैसा" हे दैवत बनवते. पैशासाठी कोणतेही मार्ग वापरणे नैतिकच(!) मानते. झटपट पैशाच्या मागे असलेले मध्यस्त, दलाल, त्यांचे हस्तक असे उपरे स्तर वाढवले जात आहेत. आक्रमक व्यक्तिवाद व पराकोटीचा स्वार्थ बोकाळून भ्रष्टाचार, गुन्हेगारी, व्यसनाधीनता याला समाजमान्यता प्राप्त होते आहे. आर्थिक अंगाने जसा भणंग वर्ग वाढत आहे तसा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अंगानेही तो पोसला जात आहे.

प्रचलित विकास प्रारुपाने निर्माण केलेला भूलभूल्लय्या उच्चशिक्षित वर्गाला भले मोठे पगार व इंपोर्टेड वस्तूंच्या माया नगरीतील भोगविलासी जीवनाची झिंग चढवून आहे. मध्यमवर्गीय ग्राहकाला लोभस जाहिराबाजीतून भुरळ घालून कोकाकोला, मॅगी, विल्ससारख्या फालतू खरेदीच्या मोहात गुंतवत आहे. सट्टेबाजीतून पैशाच्या घबाडाच्या लोभात पकडते आहे. बेकार तरुणांना सत्ताधीशांच्या आश्रयाने खंडणी वसूल करण्याच्या, काळ्या धंद्यातून पैसा कमावून सिगरेटच्या धुंदीतल्या यप्पी लाईफच्या कैफात अडकवत आहे. सत्ताधारी वर्ग अशा प्रकारे अत्यंत चलाखीने प्रचलित विकासरीतीच्या मोहजालात तरुणतरुणींना झुलवत आहे.

''विकासा"च्या बुलडोझरखाली भरडले जात असलेले शेतकरी, आदिवासी, कारागीर, मच्छीमार, कंत्राटी, हंगामी कामगार, शेतमजूर इ. श्रमिक आपला निषेध विविध आंदोलनांतून नोंदवत आहेत. परंतु ही आंदोलने मर्यादित व विखुरलेली असल्याने ती परिणामकारक ठरू शकत नाहीत. मतपेटीतूनही आपला निषेध श्रमिक जनता व्यक्त करत आहे. पण आजचे सर्व प्रमुख सत्ताधारीपक्ष-भाजप आघाडी व काँग्रेस आघाडी-यांची विकासरीती एकच असल्याने मतपेटीव्दारा वेगळा पर्याय उभा करणे शक्य नाही. या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी मार्ग एकच. जन संघटनांव्दारा लोककेंद्री पर्याय उभा करण्याच्या दिशेने प्रयत्न.

लोककेंद्री विकास : पर्यायी विकासनीतीमध्ये खाजगी नफा, भांडवल, पैसा हे केंद्रबिंदू न राहाता ''माणूस" हा विकासाचा केंद्रबिंदू राहील. उत्पादनाच्या राशींवर विकास मोजला जाणार नाही तर मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आदी मूलभूत गरजा, अर्थपूर्ण कामाचा हक्क, मानवी प्रतिष्ठेला साजेल अशा रीतीने पूर्ण करणे हे विकासाचे उद्दिष्ट!

देशाची निसर्गसंपत्ती व इतर साधनसंपत्ती समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी चिरस्थायी पध्दतीने वापरली जाईल, अशा पध्दतीने उत्पादनाचे नियोजन, आणि मानवाला गुलाम बनवणारे उत्पादन तंत्र व व्यवस्थापन पध्दती बदलून मानवी सर्जनशीलता फुलवणारी, लोकांचा प्रत्यक्ष सहभाग व नियंत्रण असलेली सहकारावर आधारित विकेंद्रित उत्पादन व्यवस्था प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले उचलली जातील. मानवी जीवनातले ''माणूस"पण वाढावे हे विकासाचे ध्येय साधण्यासाठी भौतिक गरजा तर भागल्या पाहिजेतच, पण त्याबरोबर सहकार्य, सुसंवाद व समानता आधारित सामाजिक संबंध, मानवी सभ्यता समृध्द करणारा सांस्कृतिक आविष्कार आणि लोकसहभागी शासनव्यवस्था उभी करणे हे पर्यायी विकासनीतीचे उद्दिष्ट !

कोकणामध्ये लोककेंद्री विकासाव्दारे लोकांच्या हातातली साधनसंपत्ती-जमीन, जंगलसंपत्ती, मत्स्यसंपत्ती याची आज होत असलेली व्यापारी लूट व विनाश थोपवून तसेच त्यावर होत असलेल्या बडया/परकीय कंपन्यांचे आक्रमण थांबवून त्या संपत्तीचा आधार कसा सधन करता येईल, त्याआधारे वाढता रोजगार व वाढते उत्पादन कसे मिळवता येईल यासाठी संयोजन करणे हा लोककेंद्री विकास योजनेचा उद्देश ! आज कोकणच्या संपत्तीचा एवढा विनाश झालेला आहे की त्याची पुनर्स्थापना-पुनरुज्जीवन करण्यासाठी एकात्मिक व सर्वंकष नियोजनाची निकड आहे. व्यक्तिगत पातळीवर फुटकळ कार्यक्रमांतून ते साधणे शक्य नाही. खोरे पातळीवर, गावपातळीवर सामूहिक निर्णयाने आणि लोकांच्या सहकार्याने व पुढाकारानेच हा लोककेंद्री विकास शक्य आहे. या विकासात भर असेल तो नैसर्गिकरित्या पुनरुत्पादन होणाऱ्या साधनसामुग्रीचा अधिकाधिक आधार घेणे व खनिजे, खनिज तेल आदी मर्यादित साठे असलेल्या सामुग्रीचा काटकसरीने वापर. तसेच नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट न करता (जंगले समूळ तोडणे, भूगर्भातल्या पाण्याचा पुनर्भरणापेक्षा अधिक उपसा, जमिनीची धूप, जमिनी नापिक करणे इ. टाळून) ती शाश्वत व पुनर्जीवी पध्दतीने वापरणे. आधुनिक शास्त्र व तंत्रविज्ञानाचा उपयोग व पारंपरिक अनुभवजन्य ज्ञानाचा आधार यांची सांगड घालून समुचित तंत्राचा विकास करून चिरंजीवी विकास साधणे शक्य आहे.

## नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन

जंगल : पावसाचा कोकणावर वरदहस्त! त्यामुळे कोकणामध्ये विस्तीर्ण व संपन्न जंगले होती; पण ब्रिटिशांनी जंगलतोडीवरचे निर्बंध उठवले. जहाजबांधणी, रुळांखालील तुळया इत्यादीसाठी जंगलाची प्रचंड तोड केली. स्वातंत्र्योत्तर काळातही जंगलतोड चालूच आहे. त्यामुळे डोंगर बोडखे होऊन धुवांधार पाऊस

हा जणु शाप बनला! आज रत्नागिरी जिल्ह्यात जंगलव्याप्त प्रदेश एकूण क्षेत्रफळाच्या एक टक्क्याहून कमी आहे. पूर्वी दाट जंगले असलेली जमीन बोडखी झाली आहे. जोवर दाट झाडी, झुडपे, वेलींचे गर्द आच्छादन होते तोवर पावसाचा मारा झाडाझुडपांवर होऊन पाणी संथ गतीने जमिनीवर उतरे व पालापाचोळ्याच्या आच्छादनात साठून राहून झाडांच्या मुळांनी निर्माण केलेल्या पोकळ्यांच्या आधारे हळूहळू जमिनीत मुरे. जमिनीतले पाण्याचे साठे वाढून झुळझुळ वाहणारे झरे व नदीचे पाणी वर्षभर टिकून राही. वृक्षाच्छादनामुळे जमिनीची फारशी धूप होत नसे. तेच डोंगर बोडखे झाल्याने पाणी वेगात वाहून जाऊन जमिनीची धूप प्रचंड वाढली व पाणी मुरणे जवळजवळ बंद होऊन डिसेंबरपासून पाण्याचे दुर्भिक्ष्य पडू लागले. तेव्हा ढासळलेले निसर्गसंतुलन सुधारण्यासाठी हरितीकरण करून पाण्याचा वेग कमी करणे व जमिनीची धूप नियंत्रित करणे अत्यावश्यक आहे. बांधबंदिस्तीने हे साधणे कोकणातील धुवाधार पावसामुळे कठीण व खर्चिक बनते. गवत, झुडपे, झाडे यांचे आच्छादन वाढवून कमी खर्चात पाण्याचे नियंत्रण करणे शक्य आहे. हरितीकरणासाठी सुयोग्य झाडा-झुडपांची निवड व पध्दतशीर आयोजन करणे जरुरीचे आहे. (पाहा परिशिष्ट - २ : कोष्टक १)

हरितीकरण : डोंगरउतारावर, शिवाराच्या सरहद्दीवर आणि नाल्याच्या कडेने बांबूंची रोपे लावून बांबूबेटे वाढवून चांगला अडसर निर्माण करता येतो. बांबूचे कंद लावले तर ४ वर्षांत बांबूंचे बेट तयार होते. उतारावर स्टायलो हेमाटा या गवताचा किंवा तागाचा दाट पेरा आणि खालील बाजूस टेफ्रासिया कँडिडा (ढशहि◌ीरीळर उरपवळवर) किंवा करवंद या झुडपांचे बी लावल्यास थोडक्या काळात चांगले आच्छादन वाढते. बी पेरण्यापूर्वी चोवीस तास भिजवून घेतले म्हणजे ते मातीला चिकटते व बी वाहून जाण्याचे प्रमाण कमी होते. पावसाळ्याच्या आरंभीचे मोठे पाऊस झाल्यावर बी पेरणी करणे योग्य. ही लागवड करताना प्रतिएकर बीचे प्रमाण पुढीलप्रमाणे : स्टायलो हेमाटा २ किलो, टेफ्रासिया ३ किलो, ताग २० किलो. करवंदाचे बी दोन मीटर अंतरावर व टेफ्रासियाचे तीन मीटर अंतरावर लावणे योग्य. आंबा लागवडीयोग्य जमीन असेल तर १द१द१ मीटरचे चौकोनी खड्डे दहा मीटर अंतरावर खणावेत. या खड्ड्याच्या तळात हाडे टाकून पालापाचोळा, सुपीक माती व शेणखत याने खड्डे भरावे. या वाफ्याभोवती टेफ्रासिया किंवा करवंदाचे बी पेरावे. वाफ्याभोवती काटेरी कुंपण व नैऋत्य दिशेला वाऱ्यापासून संरक्षणासाठी दगड रचून गडगे बांधावे . वाफ्यात आंब्याचे गावठी रोप लावून ते रुजल्यावर त्यावर हापूस आंब्याचे कलम करावे. हापूस आंब्याचे तयार कलम लावल्यास झाड वाढण्याचा एक वर्षाचा खर्च व वेळ वाचतो. झाड जोमाने वाढून फळे लवकर लागतात. कलम केल्यावर दोन-तीन वर्षे पाणी द्यावे लागते. ते मटका ठिबक पध्दतीने दिल्यास पाण्याची बचत होते. आंब्यायोग्य जमीन नसेल तर काजूची लागवड करावी. डोंगर उतरणीच्या खालील बाजूस करटोलीचे कंद लावले तर माती धरण्यास चांगला उपयोग होतो. कंदाची वाढ होईल तसे कंदाखालचे क्षेत्र वाढवावे. टेफ्रासिया गुरे खात नाहीत, ते वेगाने पसरते व त्याची मुळे पाणी चांगले धरून ठेवतात.

जमीन फार निकृष्ट असेल तर खड्डे घेऊन वृक्षारोपण करणे योग्य. झुडपांची निवड करताना माती धरण्यास मदतकारक कडुमेंदी, चिलार, कारवी, एरंड, इ. चर किंवा खड्डा घेऊन व तो माती-पालापाचोळ्याने भरून विविध वृक्षांची लागवड किफायतशीर होते. जंगली आंबा, सागवान, चार, कोकम, शिसम, जांभूळ, हिरडा, बेहडा, आवळा, इ. वृक्ष व त्यासोबत शिकेकाई, चंद्रज्योत, अंबाडी, शतावरी यांची लागवड फायदेशीर होते. झाडे-झुडपे लागवडीचा प्रतिहेक्टर खर्च १० ते १५००० रुपये येतो.

स्टायलो गवत कापून गुरांना ओला किंवा वाळवून उत्तम चारा होतो. तो दुधाच्या वाढीस मदतकारक ठरतो. तागाचे तंतू जाळी विणण्यासाठी किंवा कागदासाठी उपयुक्त आहेत. हरितीकरणाचा कार्यक्रम जास्तीत जास्त क्षेत्रात गावपातळीवर राबवला तर दोन वर्षात परिसरातील भूजलात लक्षणीय वाढ होऊन खोलगट भागात मुरलेले पाणी बुडकीतून काढून आंब्याच्या कलमांना देण्यासाठी उपलब्ध होते. वरील हरितीकरणाच्या कार्यक्रमासाठी भिजवलेल्या बियाणांचा पेरा करणे एवढेच श्रम आणि बियाणांची खरेदी एवढाच माफक खर्च येतो. वरीलप्रमाणे हरितीकरणाचा कार्यक्रम प्रत्येक वाडीत हाती घेणे स्त्रियांना सहज साधता येईल. त्यासाठी वाडया-वाडयांनी, गावा-गावांनी एकत्रित निर्णय घेऊन बांधबंदिस्ती व हरितीकरण योजना राबवली तर पाच वर्षात कोकणच्या पाण्याचा किमान गरजा वाडीवाडीत भागू शकतील.

पाणी-साठे : जेथे नैसर्गिकदृष्टया अनुकूल क्षेत्र असेल अशा निवडक क्षेत्रांमध्ये बंधारे बांधून पाणीसाठा निर्माण करण्याचे कार्यक्रम हाती घेऊन पाण्याची उपलब्धता अधिक वाढवता येईल. अशा योजना मुख्यत... प्रायोगिक स्वरूपात घेऊन, हरितीकरणाच्या कार्यक्रमाशी सांगड घालून शास्त्रीय मूल्यमापनानंतर अशा योजनांचा विस्तार करणे योग्य.

बांधबंदिस्ती कार्यक्रमात डोंगर उतारावरील नाल्यांवर अंतराअंतराने लाकूड-बांबूच्या अडण्या वापरून दगडाचे लहान बंधारे (पावसाचे पाणी त्यावरून वाहून जाईल) बांधून पावसाचा वेग कमी करता येईल. नाल्यांच्या बाजूने उतारावरून वाहणारे पाणी कंटूरवर चर खणून व डोंगरावरील सपाटीच्या भागात लहान तळी खोदून, ही तळी चराने जोडून पाण्याचा वेग कमी करता येईल आणि जागोजागी थोडेथोडे पाणी तात्पुरते साठवले जाईल. बंधारे कार्यक्रमाबरोबर हरितीकरणाचा कार्यक्रम राबवणे आवश्यक आहेच. डोंगरपायथ्याजवळ ओढयांवर बंधारे बांधून लहान साठे तयार करून शेतीसाठी रब्बी पिकाला पुरेसे पाणी साठवता येईल. पायथ्याजवळील जमिनीत उताराने वाहणाऱ्या पाण्याच्या मार्गात विहिरी खणून पावसाचे पाणी जमिनीत जिरवता येईल. एका भूपृष्ठ जलविहिरीचा एक किलोमीटर क्षेत्रापर्यंत परिणाम होऊ शकतो. वरीलप्रमाणे संयोजन केल्याने पाणी साठण्याचे प्रमाण वाढून विहिरींचेही पाणी वाढेल. पिण्याचे, गुरांसाठी लागणारे व फळबागा शिंपण्यास लागणारे पाणी वाडीवाडीवर उपलब्ध होईल. साधारपणे हेक्टरमागे ५००० ते ७५०० रुपये खर्च म्हणजे गावासाठी सुमारे ४० ते ५० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. यातील मुख्य

खर्च मजुरीचा असल्याने हा पैसा गावीच हाती राहील.

गावातील शेती व पाण्याची गरज : नमुन्यादाखल एक उदाहरण घेऊन गावातल्या पाण्याची गरज काढू. गावचे क्षेत्रफळ १००० हेक्टर, लोकसंख्या १५००, गुरांची संख्या ६०० आणि शेतीखालची जमीन १५० हेक्टर असे सरासरी चित्र विचारात घेऊ. माणसांसाठी प्रत्येकी रोज १०० लिटर व गुरांसाठी २०० लिटर. फलोद्यान विकसित करायचे झाल्यास हेक्टरमागे २०० झाडे व दर झाडामागे दरवेळी १०० लिटर पाणी असे ४० आठवडे पाणी घालावयाचे झाल्यास हेक्टरमागे ८ लाख लिटर व १०० हेक्टर फलोद्यानासाठी ८०० लाख लिटर पाणी लागेल. कोकणात मुख्यत... भातशेती होते. त्यासाठी पावसाचे पाणी जमीन सुधारणा कार्यक्रमाव्दारा उपलब्ध करून देणे शक्य आहे. ते साठवून ठेवण्याची गरज नाही. पावसाळ्यात दोडका, पडवळ, दुधी भोपाळा, तांबडा भोपळा आदी भाज्याही लावणे शक्य आहे. रब्बी हंगामामध्ये वाल, चवळी, मोहरी, टोमॅटो, वांगी, भेंडी, पालक, मेथी, कोथिंबीर आदी भाज्यांचे उत्पादन पाणी उपलब्ध असल्यास घेणे शक्य आहे. पिकांखालील जमिनीच्या एक तृतीयांश जमीन म्हणजे ६० हेक्टर जमीन रब्बी हंगामात सिंचित शेतीखाली आणण्यासाठी २५०० लाख लिटर पाणी लागेल. रब्बी पिकाविना पाण्याची गरज १८ हेक्टर मीटर (१ हेक्टर मीटर = १ कोटी लिटर) व रब्बी पिकांसह ४३ हेक्टर मीटर पाणी उपलब्ध करणे आवश्यक आहे. ३००० मि.मी. पावसातील गावाच्या क्षेत्रातून सुमारे २२५० हेक्टर मीटर पाणी वाहून जाते. पावसाचे फक्त दोन टक्के पाणी अडवण्याची सोय केली तर कोकणामध्ये शेतीची भरभराट होऊ शकेल.

सुधारित शेती तंत्र : हरितक्रांती तंत्रज्ञानाचा आक्रमक प्रसार करून सरकारने रासायनिक खते व कीटकनाशके यांच्यावरील अवलंबन वाढवले. त्यामुळे जमिनीचे फूल बिघडणे व पाणी प्रदूषित होणे असे प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून या शेती तंत्राचा फेरविचार करण्याची गरज आज जाणवत आहे. पारंपरिक मशागत पध्दतीला आधुनिक तंत्रविज्ञान व प्रयोग यांची जोड देऊन चिरस्थायी शेतीविकास साधणे शक्य आहे. आज रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा ज्या पध्दतीने वापर होतो आहे त्यामुळे जमिनीतील जैविक साखळीच मोडली जाते. जमिनीत वनस्पतीजन्य माल वाढविण्यासाठी योग्य प्रमाणात पाणी, सेंद्रिय खते व हरित खते वापरणे जरूर आहे. सेंद्रिय खते बनविण्याच्या सुधारीत पध्दती उपलब्ध आहेत. पुरेसे वनस्पतीजन्य मालाचे उत्पादन करून त्यातला वाढता भाग जमिनीत परत जाऊ दिला तर जैविक साखळीची व्याप्ती वाढते. तिच्यातून फिरणारा जैविक माल वाढतो व मातीचे फूल बांधले जाते आणि उत्पादकता वाढते. योग्य पिकांची निवड, पीकपध्दती व पाणी देण्याची पध्दत, खते बनवताना व वापरताना घेण्याची काळजी याव्दारे पर्यावरणवर्धक शेतीकडे वळून शेतीचा नगदी खर्च कमी करून उत्पादनवाढ साधता येईल. कृत्रिम खतांच्या अति वापरामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास थांबेल. परकीयावलंबन कमी

होईल. कोकणमध्ये अनेक थरांची लागवड करून जमिनीचा पर्याप्त उपयोग शक्य आहे. उंच नारळ, सुपारी, आंबे, फणस, कोकम इ. झाडे त्याच्यावर मिरे, पानवेल, झाडांमधील जागेत, आपटा, डिकेमाली, कुडा, बिब्बा, अडुळसा, निरगुडा, तमालपत्र, कोरफड, दालचिनी, तोरण व शेताच्या कडेला बांबू, एरंड, सागरगोटा, शिकेकाई, कारवी इ. लावून लागवडीयोग्य मर्यादित जमिनीचा कमाल उपयोग करून भरपूर उत्पादन काढता येईल. परसबागेतही चांगले उत्पन्न घेणे शक्य आहे. रोजच्या रोज तेथे घरगुती वापराचे पाणी व खत पडतेच. तेव्हा केळी, पपई, अननस, आले, गवतीचहा, तुळस, कोरफड, अडुळसा, शेवगा, भोपळा, वाल, घेवडे अशी पाण्याची गरज असलेली पिके परसबागेत वाढवता येतील.

फळबागांचा विकास : सरकार फलोद्यान योजनेखाली मोठे अनुदान देत आहे. पाणी उपलब्ध असेल तेथे याचा फायदा घेणे शक्य आहे; परंतु असे क्षेत्र मर्यादित आहे. म्हणून हरितीकरणावर भर देऊन पाण्याची उपलब्धता वाढवणे आवश्यक आहे. त्याआधारे आंबा लावणे शक्य होईल. आंबा लागवडीकरता दर हेक्टरमागे तीन वर्षासाठी ४५ हजार रु. खर्च व काजू लागवडीसाठी ३० हजार रु. खर्च अपेक्षित आहे. (२००७च्या किंमतीत) यातील ७०% खर्च मजुरीवर आहे. रोजगारहमी योजनेखाली फलोद्यान योजना आणून सरकारमार्फत ७५ ते १०० % अनुदान देण्याची तरतूद आहे. या योजनेखाली मोठया प्रमाणात आंबा, काजू यांची लागवड केली जात आहे. अधिकृत आकडेवारीनुसार रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे ६१ हजार हेक्टर आंबा, ८३ हजार हेक्टर काजू व पाच हजार हेक्टर क्षेत्र नारळाखाली आहे. या योजनांचा फायदा लहान शेतकऱ्यांना घेणे कठीण जाते. कारण ४-५ वर्षे उत्पन्नासाठी थांबण्याएवढी आर्थिक क्षमता नसते. देखभालीच्या काळात अशा शेतकऱ्यांना त्या जमिनीपासून काही उत्पन्न मिळत असेल तर त्याच्या भरपाईची तरतूद करणे जरुरीचे आहे. किनारपट्टीवर अजून खोती पध्दतीचे छुपे अवशेष आहेत. कुळांना जमीन नावावर नसल्याने गुंतवणूक करणे शक्य होत नाही. खोती पध्दत नष्ट करून कुळांच्या नावे जमीन होण्याचा प्रश्न धसास लावून कसणाऱ्यांच्या नावे जमीन होणे अगत्याचे आहे. त्यायोगे कुळांना फळबागा वाढवून शाश्वत व वाढते उत्पन्न घेणे शक्य होईल.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सुमारे ४५ टक्के क्षेत्रफळ पड आहे. त्यातील सुयोग्य जमीन आंबा, काजू याखाली आणून त्यापासून चांगले उत्पन्न मिळवणे शक्य आहे. पड जमिनीचा वापर मुख्यत्वे हरितीकरणासाठी करणे हे पर्यावरण संतुलन व स्थलविशेषानुरूप जैविक विविधता जोपासण्यासाठी आवश्यक आहे. केंद्र सरकारची पश्चिम घाट विकास योजना व राज्य सरकारची एकात्मिक पाणलोट विकास योजना, आदर्श गाव विकास योजना व फलोद्यान विकास योजना या योजनांखालील निधी वापरून पाणलोटक्षेत्र विकास व शेती-फळबागा विकास साधता येईल. अशा समुचित योजनांआधारे कोकणच्या खेडेगावांच्या ४-५ वर्षांत कायापालट होऊ शकेल. हिरवीगार वने, झुळझुळते झरे आणि रसरसते जीवन फुलेल. त्याऐवजी महाराष्ट्र

सरकार औष्णिक वीजप्रकल्प व रासायनिक कारखाने निमंत्रित करून मेलेले मासे, रोगिष्ट गुरे, व्याधीग्रस्त जनता आणि निसर्गसंपत्तीचा विनाश कोकणवर लादते आहे. हे वेळीच ओळखून विनाशकारी औद्योगीकरणाला कसून विरोध आणि निसर्गसंपत्ती आधारीत विकासाचा पाठपुरवठा करणे अगत्याचे आहे. या आधारे आज कापडगिरणीतून फेकला गेलेला रत्नागिरीतला कामगार वाडीवर चांगले जीवन जगू शकेल. एवढी उत्पादनक्षमता कोकणाच्या जमिनीत आहे. गरज आहे ती कोकणी माणसाने खऱ्या विकासाच्या प्रश्नात संघटितपणे लक्ष घालण्याची.

प्रक्रिया उद्योग : निसर्गसंपत्तीच्या विकासापाठोपाठ अनेकविध प्रक्रिया उद्योग व कसबी उद्योग उभे करता येतील. आंबा, काजू, नारळ, आमसूल, फणस, अननस ही फळे आणि दालचिनी, जायफळ, मिरे आदी मसाल्याची पिके, सर्पगंधा, निरगुडी, सतवीण, हिरडा आदी औषधी वनस्पती, शिकेकाई, मध, बांबू, मस्त्य संपत्ती आदी. कच्च्या मालावर प्रक्रिया उद्योग उभारण्यास मोठा वाव आहे (पाहा परिशिष्ट-२ : कोष्टक २). त्यासाठी खादी ग्रामोद्योग, लघुउद्योग विभाग, स्वयंरोजगार योजना अशा अनेक व्यक्तिगत पातळीवरील मदत योजनाही आहेत. परंतु त्यामधून लहान उद्योगांचा प्रश्न सुटत नाही. कुटुंब पातळीवर हे उद्योग चालतात. त्यामुळे कच्चा माल नियमितपणे मिळवणे, खेळते भांडवल पुरेसे व वेळेवारी हाती असणे, तयार मालाला बाजारपेठ मिळवणे, माल पुरवठा व्यवस्था, पैशाची वसुली, प्रत्यक्ष उत्पादनातल्या अडचणी असे व्यवस्थापकीय, तांत्रिक, आर्थिक व्यवहार सांभाळणे अशक्य होते. परिणामी संस्थात्मक पाठबळाविना हे उद्योग खेडेपातळीवर तंत्रशिक्षित तरुण-तरुणींना स्वतंत्रपणे चालवणे जवळपास अशक्य होते. त्यातून आज जाहीरातबाजीमुळे बडया कंपन्यांचा माल 'लोकप्रिय' बनला आहे. दुकानदारही चांगले कमिशन मिळते म्हणून तो माल विक्रीसाठी ठेवणे पसंत करतात. त्यामुळे लहान उद्योगांना मालविक्रीचा गंभीर प्रश्न भेडसावतो. वास्तविक पाहता विकेंद्रित पध्दतीने रोजच्या गरजेच्या अनेक वस्तूंचे उत्पादन शक्य आहे. त्यामुळे आवरण (पॅकिंग), वाहतूक, उर्जा बचत होईल आणि स्थानिक पातळीवर रोजगार मिळेल. परंतु त्यासाठी भक्कम संस्थात्मक आधार उभा करणे आवश्यक आहे. जिल्हा सहकारी बँक किंवा जिल्ह्यातील राष्ट्रीयीकृत 'लीड' बँक यांच्या पुढाकाराने बँकेमध्ये 'ग्रामीण उद्योग विकास केंद्र' स्थापन करून लघुउद्योग विकासाची जबाबदारी घ्यायला हवी. या केंद्रामार्फत तांत्रिक व आर्थिक बाबींच्या अभ्यासाआधारे स्थानिक पातळीस अनुरूप उद्योग प्रकल्पांचे आराखडे तयार करून त्याबाबत मार्गदर्शन व सल्ला आणि त्याला अनुसरून कर्जपुरवठा व्यवस्था उभी केली पाहिजे. तयार मालाला ग्राहक बांधून घेऊन निश्चित बाजारपेठ मिळवली पाहिजे. सरकार हे एक मोठे गिऱ्हाईक आहे. सरकारने आपली खरेदी ग्रामीण उद्योग विकास केंद्रांव्दारा करण्याचा निर्णय घेऊन आपली मागणी नोंदवली व बिले वेळेवर भरली तर मोठी व खात्रीशीर बाजारपेठ मिळेल. शिवाय अपना बाझार, ग्राहक भंडारे, कर्मचारी सोसायटया, वसतीगृहे इत्यादी ठोक गिऱ्हाईके बांधून

घेणे शक्य आहे. कच्चा माल स्थानिक पातळीवर उपलब्ध असला तरी तो गोळा करण्याची तत्पर यंत्रणा बांधणे जरूर आहे. लघुउद्योगांसाठी आधारभूत अशी केंद्रे तालुका पातळीवर उभी करून त्यांच्या मदतीने गावोगावी प्रक्रिया व इतर उद्योग यांचा विस्तार करणे शक्य होईल.

आंबा, सुपारी, नारळ, मासे यांच्या विक्रीसाठी शेतकरी व मच्छिमार व्यापाऱ्यांवर अवलंबून असल्यास त्यांना भाव कमी मिळतो. व्यक्तिगत पातळीवर शेतकऱ्यांना व्यापार-प्रक्रियाउद्योग ही जबाबदारी पेलवणे कठीण जाते. तेव्हा शेतकरी, मच्छिमार यांच्या सहकारी सोसायटयांमार्फत ही जबाबदारी घेणे शक्य आहे. या सहकारी सोसायटयांनी शहरातील कामगार, कर्मचारी, शिक्षक आदींच्या ग्राहक-पत सहकारी संघटनांशी संपर्क साधून बांधिल ग्राहक मिळवण्याची व्यवस्था केली तर ग्राहकांना खात्रीशीर माल व शेतकऱ्यांना स्थिर व किफायतशीर भाव मिळू शकेल. अर्थात यामध्ये सहकाराचे तत्व काटेकोरपणे पाळले पाहिजे.

**मत्स्यव्यवसाय** : कोकणची किनारपट्टी ७२० कि.मीटर लांबीची असून ३९४ खेडी मत्स्यव्यवसायात गुंतलेली आहेत. २००० साली मच्छिमारांच्या २३९५ सहकारी सोसायटया होत्या व २३२ हजार सदस्य होते. कोळी, भोई, खारवी आदी पारंपारिक मच्छिमार व्यवसाय करणाऱ्या जाती अजूनही मत्स्यव्यवसायात आहेत. तागाची जाळी स्वत...च विणून होडीतून समुद्रात किनाऱ्यापासून नजिकच्या टापूत त्या मासे पकडत. मुख्यत... ताजे मासे, वाळवलेले, खारवलेले मासे आसमंतातील खेडयात आणि मध्यस्तांमार्फत विक्रीसाठी शहरात जात. पंचवार्षिक योजनेमध्ये उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने मोटार बोटी आणि टिकाऊ म्हणून नायलॉन जाळ्यांचा प्रसार शासनाने केला. मच्छिमाऱ्यांच्या सहकारी सोसायटयांमार्फत यांत्रिकीकरणाचा कार्यक्रम राबविला गेला. त्यांची मालकी मत्स्यव्यवसायातील व्यापारी–सावकार किंवा सधन मच्छिमार यांची असून बोटीवर कामासाठी पारंपरिक मच्छिमारच प्रामुख्याने आहेत. १९९१ मध्ये कोकण किनारपट्टीवर ३४५ हजार टन मासे पकडण्यात आले. तर २००० साली ३९८ हजार टन. १९९१ ते २००० दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यात मत्स्य उत्पादनात ५० हजारापासून ७६ हजारापर्यंत वाढ झाली. २००० सालचे इतर जिल्ह्यातील उत्पादन पुढीलप्रमाणे : मुंबई (१४५ हजार), ठाणे (९० हजार), रायगड (४८ हजार), सिंधुदुर्ग (२९ हजार). रत्नागिरी जिल्ह्यातील प्रमुख जाती बळा वाकटी, शिंगाडा, तारली, खवली, जवळा, बांगडा, न्हाकूळ, लेप आणि कोळंबी या होत. २००५–०६ साली एकूण उत्पादन ४४५ हजार टन झाले, त्यातील १२४ हजार टन निर्यात झाले.

किनाऱ्यापासून नजिक ४० मीटर खोलपर्यंतच्या पट्ट्यात सर्वात अधिक मत्स्यसंपत्ती आढळते. कारण या उथळ भागात सूर्यप्रकाश मिळाल्याने वनस्पतीची वाढ चांगली होते. पारंपरिक मासेमारीचा दर हा पुनउत्पादनाहून कमी आणि माशांची अंडी, लहान पिल्ले यांना इजा न पोचता, थोडक्यात पर्यावरण समतोल सांभाळून चालत असे. खोल समुद्रात पारंपरिक मच्छिमार पोचत नाही. तेव्हा तेथील मत्स्यसंपत्ती

मिळवण्यासाठी सरकारी उत्तेजनाने ट्रॉलरचा उपयोग व पर्ससेन जाळी यांचा वापर सुरू झाला. पर्ससेन जाळी संबंध मत्स्यसमूहाला वेढून लहान मासेही पकडतात. तर ट्रॉलर तळ खरवडून समुद्रातील माशांच्या वसाहत स्थानांना धक्का पोचवतात. अशा रितीने माशांच्या पुनरुत्पादनाच्या चक्राला आणि त्यांच्या वसाहत स्थानांना धक्का पोचून मत्स्यसंपत्ती धोक्यात येऊ लागली. याशिवाय खोल समुद्रात मासेमारी करण्यास परवाना असलेली जहाजे किनाऱ्याजवळ विपुल मत्स्यसंपत्ती असल्याने बेकायदेशीरित्या उथळ समुद्रातही मासेमारी करतात. मोठया जहाजांच्या प्रचंड जाळ्यात बरेच मासे अडकले जाऊन तसेच छोटे मासेही पकडले जाऊन त्यांचा विनाश होतो. त्यामुळे पारंपरिक मच्छिमारांचे उत्पादन घटू लागले. खाउजा धोरणाखाली सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्यांना खोल समुद्रात मासेमारी करून जहाजावरच प्रक्रिया करून ती मत्स्यसंपत्ती परस्पर निर्यात करायला मुभा दिली आहे. याचा अर्थ मासेमारी व्यवसायिकांमार्फत जे मासे खेडोपाडी लोकांना विकले जात, त्याचा पुरवठा कमी होऊन लोकांचा मत्स्याहार–प्रथिनांचा एकमेव स्रोत पण धोक्यात येत आहे.

मत्स्यसंपत्तीला दुसरा मोठा धोका आहे प्रदूषणाचा. नदी, खाडया, समुद्र यांच्या प्रदूषणात वाढ होत आहे. त्यामुळे समुद्रातील वनस्पती संपत्ती कमी होऊन मत्स्यसंपत्तीवर विपरित परिणाम होत आहे. तसेच खड्डे, दलदली प्रदेश भरण्यासाठी कचरा वापरला जातो. त्यामधील पाण्यात विरघळणाऱ्या रसायनामुळे ओढे, नाल्यातील प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे मासे मरणे, त्यांचे पंख झडणे, पकडल्यावर लवकर सडणे असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. असा विनाश थोपवण्यासाठी प्रदूषण वाढेल असे औष्णिक ऊर्जा प्रकल्प व उद्योग यांची कोकणमधील वाढ थांबवली पाहिजे आणि आहे त्या कारखान्यातील प्रदूषित पाणी व कचऱ्याची विल्हेवाट यावर कडक नियंत्रण घातले पाहिजे. जागरूक ग्रामसमितीना यामध्ये लक्ष घालावे लागेल.

मत्स्यव्यवसाय सुधारण्यासाठी सहकारी सोसायटयांची पुनर्रचना करून आवश्यक ती तांत्रिक मदत, दुरुस्ती सेवा व कर्जपुरवठा व्यवस्था बँकांमार्फत बळकट केली पाहिजे. मत्स्य व्यवसायामध्ये बहुराष्ट्रीय व बडया भारतीय कंपन्यांना प्रवेश देता कामा नये. कोकणची मत्स्यसंपत्ती पारंपरिक मच्छिमार व्यावसायिकांसाठी राखून ठेवली पाहिजे, म्हणजे पुरेसा मासेपुरवठा होईल आणि जनतेला माशाचे कालवण परवडेल अशा किंमतीत मिळू शकेल. कोकणामध्ये तागाचे उत्पन्न चांगले होते व त्याची जाळी विणण्याचे पारंपरिक कसब टिकून आहे. तागाची जाळीच वापरणे योग्य होय. कारण नायलॉनची जाळी विघटन होत नसल्याने तुटलेल्या जाळ्याचा समुद्रातील साठा वाढत जाऊन वनस्पतीची वाढ व माशांच्या हालचाली या दृष्टीने वाढता अडथळा निर्माण होऊन मत्स्यजीवनास ते हानीकारक आहे. तागाचा तंतू टिकाऊ करण्याच्या दृष्टीने रासायनिक प्रक्रिया उपलब्ध आहेत.

मासे वाळवणे व मीठ/हळद लावून खारवणे यासाठी आवश्यक त्या छपऱ्या, बर्फाचे उत्पादन व इतर प्रक्रिया सुविधा मच्छिमारांच्या सहकारी सोसायटी व्दारा उपलब्ध झाल्या पाहिजेत. तसेच कर्ज व विक्री व्यवस्था या सोसायटयांमार्फत करून मच्छिमारांचे व्यापाऱ्यांवरील अवलंबित्व दूर करणे अगत्याचे आहे. यासाठी ग्राहक संस्थांशी संबंध बांधून मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर इ. शहरातील ग्राहक संस्थांना थेट पुरवठा करण्याची व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. त्यामुळे मच्छिमारांना रास्त भाव मिळू शकेल.

**मच्छिमारीसाठी बंदरविकास :** कोकण किनाऱ्यावर ४९ लहान बंदरे आहेत. त्यामध्ये मत्स्य उद्योगासाठी आवश्यक सोयी व सुविधा सुस्थापितपणे विकसित केलेल्या नाहीत. रत्नागिरीतील मिरकरवाडा मच्छिमारी बंदर विकासाचे काम वर्षानुवर्षे रेंगाळले. खाडयांतून व बंदरातून साचलेला गाळ हा बंदर विकासातला अडसर आहे. पण तो गाळ एकदा उपसून प्रश्न सुटणार नाही. कारण कोकणातल्या बोडक्या डोंगरावरून धुवाधार पाऊस कोसळतो व माती वाहून नद्या व खाडया गाळाने भरत राहातात. परिणामी पुराच्या पाण्याचा निचरा जलद होत नाही व गाळाचा साठा दरवर्षी वाढतच राहतो. थोडक्यात कोकणचा बंदर विकास पर्यावरण संतुलनाच्या प्रश्नाशी निगडीत आहे. हरितीकरणाचा कार्यक्रम युध्द पातळीवर राबवला तरच गाळ साचण्याचा वेग नियंत्रित करता येईल. प्रत्येक जिल्ह्यात एक बारामाही बंदर मासे, काजूगर, आंबे, आदींच्या निर्यातीच्या सोईप्रमाणे विकसित करणे आणि ठाणे जिल्ह्यातील सातपाटी, रायगड जिल्ह्यातील रेवस, रत्नागिरी जिल्ह्मह्यातील साखरीनाटे , सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड आदी बंदरांचा मच्छिमारी बंदरे म्हणून विकास करणे महत्तवाचे आहे. कोकणमध्ये रेल्वे आणि एस.टी.ची चांगली सुविधा उपलब्ध झाल्याने प्रवासी वाहतुकीसाठी सागरी प्रवासाला मागणी कमी झालेली आहे. परंतु मत्स्यव्यवसायासाठी व मालवाहतुकीसाठी बंदर सुविधांचा सुयोग्य विकास करणे आवश्यक आहे.

ऊर्जा : ऊर्जा पुरवण्यासाठी जैवमाल, लघुजलस्त्रोत, सूर्य अशा चिरंजीवी ऊर्जास्त्रोतांचा पाठपुरावा न करता केंद्रीभूत पध्दतीने वीजनिर्मितीवर भर दिला जात आहे. केंद्रित वीजपुरवठयामुळे विजेचे वहन व वितरण यासाठी मोठा खर्च करावा लागतो आणि त्यामध्ये वीज गळतीने मोठा अपव्ययही होतो. कोकणामध्ये चिरंजीवी ऊर्जास्रोत भरपूर उपलब्ध आहेत. महाराष्ट्र राज्याच्या सिंचन खात्याने महाराष्ट्रातील जलविद्युत क्षमतेबाबत अहवाल तयार केला आहे. त्यातील मुख्य जलविद्युत स्रोत कोकणातच आहेत. या अहवालात कोकणामध्ये एकूण १८६ प्रकल्पांच्या जागा दाखवल्या आहेत. मध्यम व लहान धरणांवरील जलविद्युत प्रकल्प व कालव्यावरील प्रकल्प यातून सुमारे १५०० मे.वॉ. क्षमतेची भर घालणे शक्य आहे. तर ४३ जल-खेच साठा प्रकल्पांमार्फत (pumped storage) ज्या प्रमाणात रात्री वीजनिर्मिती क्षमता शिल्लक असेल त्याच्या ८० टक्के म्हणजे २००० ते २५०० मे.वॉ. क्षमता वाढवणे शक्य आहे. कोकणात पवनचक्कीचा वापर करूनही खेचसाठा योजना राबवता येईल. जंगल व शेतातील काडीकचरा, पालापाचोळा अशा जैविक

इंधनांचा वापर करून औद्योगिक प्रक्रियांना लागणारी ऊर्जा पुरवणे शक्य आहे किंवा सूर्य व जैविक इंधनाचा वापर करून लहान जनित्र(५ ते १० कि.वॉ.) बसवून विकेंद्रित वीजपुरवठा करण्याचे तंत्र प्रयोगांती सिध्द झाले आहे. अशी परिस्थिती असताना जैतापूर अणुऊर्जा व अन्य औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प कोकणावर लादणे मोठे अन्यायकारक व विनाशकारी आहे.

बांधकाम-बंधारे : दगडाचे कच्चे बंधारे बांधण्याची परंपरागत पध्दत कोकणात वापरात आहे. बंधाऱ्यांना बळकटी आणण्यासाठी लाकडी अडण्या लावण्याचीही प्रथा आहे. त्यामध्ये सुधारणा करून बांबू व लाकूड यांचा सांगाडा वापरून लहान बंधारे बांधल्यास टिकण्याची शाश्वती वाढते असे अनुभवावरून दिसून आलेले आहे. लाकूड व बांबू पाण्यात टिकावे या दृष्टीने रासायनिक संस्करण प्रक्रियातंत्र उपलब्ध आहे. कोकणात लहान बंधारे बांधण्याची मोठया प्रमाणात गरज आहे. यासाठी पूर्वपाहाणी करणे बरेच खर्चिक असल्याने ठोकताळ्याने बंधाऱ्याची जागा निवडली व कच्चा बंधारा उभा केला आणि त्याची उपयुक्तता व समुचितता पाहून पुढील वर्षी त्याचे काम पुरे करणे शक्य आहे. जागा समुचित वाटली नाही तर लाकूड-बांबूचा सांगाडा हलवून अन्यत्र बंधारा उभा करणे अल्प खर्चात शक्य होते. मुख्य प्रश्न आहे सामूहिक कृतीचा. तो गावपातळीवर सोडवावा लागेल. साठवलेले पाणी चटकन झिरपून जाऊ नये यासाठी अस्तर देण्यासाठी माफक खर्चाची विविध तंत्रे विकसित केलेली आहेत. ताग, वाखासारखे तंतू, बेंटोनाईट, माती, वाळके गवत, बारीक जाळीवर सिमेंटचा (माती-वाळू-राख (flyash) मिश्रित) थर इत्यादी विविध साहित्याचा स्थानिक परिस्थिती, तळ्याचा आकार इ. विचारात घेऊन वापर करणे श्रेयस्कर होते.

घरबांधणी : घरबांधणीसाठीही रासायनिक संस्करण केलेला लाकूड व बांबूचा सांगाडा वापरण्याची पध्दत आणि विटेऐवजी दाबून तयार केलेले मातीचे ठोकळे (blocks) (त्यामध्ये चुना, तंतू, सिमेंट व राख (fluash) याचा वापर) वापरून स्थानिक मालाआधारे व ऊर्जेची बचत करून कमी खर्चात घरबांधणीचे यशस्वी प्रयोग झालेले आहेत.

कोकणच्या किनारपट्टीचे संरक्षण : किनारपट्टीचे संरक्षण हा आज जीवन मरणाचा प्रश्न बनलेला आहे. कारण जगभर समुद्रपातळी वाढत असल्याचे संकेत मिळत आहेत. यापासून खारफुटीच किनाऱ्याचे रक्षण करू शकते. खारफुटीची जंगले नैसिर्गकरित्या वाढून त्यांना विस्तारासाठी आवश्यक ती भूमी किनाऱ्यावर मोकळी ठेवणे अगत्याचे आहे. भारतामध्ये किनारपट्टीवर भरतीरेघेपासून ५०० मीटर पर्यतचा मुलुख मोकळा ठेवण्याची तरतूद (C.RZ..) त्या दृष्टीनेच केलेली आहे. किनाऱ्यावर मोठे मोकळे संक्रमण भूप्रदेश राखल्याने खारफुटीचा विस्तार समुद्रपातळीनुसार सहजगत्या होऊन किनाऱ्याचे रक्षण करणे शक्य आहे. परंतु कोकण किनारपट्टीवर अतिक्रमणे चालू आहेत. रस्ते, बंधारे, पर्यटन गृहे, हॉटेल्स, व अन्य इमारती, झिंगे उत्पादन आदी कारणाने खारफुटींच्या मागचे सपाट प्रदेश व्यापले जात आहेत. एवढेच नव्हे तर रस्ते, बंदरे, धक्के व

इतर बांधकाम यापायी खारफुटीची जंगले तोडली जात आहेत. हे थोपवून किनाऱ्यावरील खारफुटीचे रक्षण, संवर्धन व विस्तार यास अग्रहक्क दिला पाहिजे. त्यासाठी किनाऱ्याजवळील समुद्राची खोली, भरती-ओहोटी, लाटांची उंची, गाळाचे स्वरूप, खारफुटीच्या प्रजाती, त्यांची घनता, क्षेत्रविस्तार आदीचा शास्त्रीय अभ्यास करून विस्तारासाठी आवश्यक तो भूप्रदेश पूर्णतया मोकळा राखला पाहिजे. त्यादृष्टीने १९९१च्या किनाऱ्याच्या रक्षण विषयक (Coastal Regulatory Zone) अधिसूचनेचे पालन चोख होण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

शासनाने मात्र सदर तरतुदी रद्द करून ''किनारी प्रदेश व्यवस्थापन" (Coastal Zone Management) अधिसूचना अंमलात आणण्याचे ठरवले आणि १ मे २००८ रोजी ही नवी अधिसूचना प्रसिध्द केली. त्यामध्ये किनारीप्रदेशाचा उंचसखलपणा, उंची, तिथले भूरूपशास्त्र, किनाऱ्यावरील झीज व भर आदी घटक विचारत घेऊन नियमनरेषा (Set Back Line) आखावी असे सुचवले आहे. नियमनरेषा आखणे व विभाग (Zone) पाडणे यासाठी केवळ काही निकष सुचवले आहेत. त्याच्या शास्त्रशुध्द आखणीविषयी काही स्पष्टता नाही. तेव्हा प्रत्यक्षात ही रेषा आखण्याचे काम केव्हा व कसे पूर्ण होईल हे शंकास्पद आहे. विभाग एकमध्ये फक्त खारफुटी, प्रवाळ खडक, पुळणी (Beach), किनाऱ्याचा दलदली भाग समाविष्ट आहे. पण त्यांच्या संरक्षणासाठी किनाऱ्यावरती भरती रेषेपासून किमान ५०० मीटरपर्यंत जागा मोकळी राखण्याची तरतूद नाही. विभाग २ व ३ मध्ये तर मत्स्यव्यवसाय वाढीसाठी केलेले बांधकाम, जहाज बांधणी, पर्यटन व्यवसायाशी निगडीत सुविधा, वीज प्रकल्प, औद्योगिक क्षेत्र, बंदरांचा विकास, विमानतळ, वादळापासून संरक्षण होण्यासाठी बांधकाम आदीस मुभा ठेवण्यात आली आहे. अधिसूचनेची मांडणी एवढी संदिग्ध आहे व त्यामध्ये एवढे कच्चे दुवे ठेवले आहेत की किनारी पर्यावरणाचा आज जो अनिर्बंध ऱ्हास चालू आहे आणि पारंपरिक मच्छिमारांची पिछेहाट व कोंडी वाढत आहे, त्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी या अधिसूचना बेतलेल्या दिसतात. १९९१च्या किनारपट्टी प्रदेश अधिसूचनेचा हेतू होता की सागर आणि जमीन यांच्या सीमा रेषेवरील अत्यंत गुंतागुतीच्या व नाजूक (Fragile) नैसर्गिक परिसंस्था व पर्यावरणाचे मानवी अतिक्रमणापासून संरक्षण करणे. त्या हेतूला हरताळ फासून २००८ची अधिसूचना नफेखोरीसाठी किनारपट्टीचे ''व्यवस्थापन" करण्याच्या दृष्टीने बेतलेली आहे. याचा अर्थ ''सागरी सेझ" अथवा किनारपट्टीच्या विध्वंसाचा मुक्त परवाना ! परिणामी किनारपट्टीचे खाजगीकरण वेगाने होईल. हे संकट रोखले नाही तर पिढयानुपिढया मच्छीमारीच्या आधारे जगणारी हजारो कु$टुंबे देशोधडी लागतील. एवढेच नाही तर बांधकामापायी खारफुटीचे संरक्षण नष्ट झाल्यास किनारपट्टी नजिकच्या बागा, वाडया, शेते, गावे सारेच जनजीवन धोक्यात येईल.

## कोकणच्या भरभराटीसाठी

समुचित लोक संघटना : कोकणच्या नैसर्गिक अनुकूलतेमुळे निसर्ग संवर्धन - संरक्षणाव्दाराच कोकणचा सर्वोत्तम विकास साधता येईल. त्यासाठी व्यापारी लूट व औष्णिक विद्युत प्रकल्प आणि औद्योगिक अतिक्रमणे थोपवणे ही पहिली पायरी. सामूहिक, शास्त्रीय नियोजनामार्फत सागरी व वनसंपत्तीची पुनस्र्थापना ही दुसरी पायरी. या संपत्तीच्या चिरस्थायी पध्दतीने वापर करून त्याच्या आधारे कोकणच्या शेतकरी, मच्छीमार, कारागीर-सर्व श्रमिकांना अर्थपूर्ण काम आणि चांगले जीवनमान मिळवणे ही तिसरी पायरी. पण यासाठी संघटनेचा भक्कम आधार उभा करणे अगत्याचे आहे. तरच मच्छीमार, शेतकरी यांची आज होणारी लूट थांबविता येईल. उत्पादकांच्या सहकारी संस्थाच शास्त्रीय नियोजन आणि त्याची अंमलबजावणी करू शकतील. त्यासाठी कज्जे, कोर्टबाजी, अंधश्रध्दा, चाकरमानी वृत्ती यास मुरड घालून योजकत्व, शास्त्रीय दृष्टी, स्वावलंबन, संघटन कौशल्य, सहकार्य याची कास धरणे अगत्याचे आहे. गावपातळीवर ग्राम समितीमार्फत ग्रामविकासाचा एकात्मिक आराखडा सामूहिक सहभागाने तयार केला पाहिजे. जमीन व पाणी यांचे एकत्रित नियोजन, हरितीकरण व वनीकरण, फलोद्यान विकास, तळी/बंधारे यांची देखभाल, शेती सुधारणा, गवत व चारा व्यवस्थापन, जंगल संरक्षण अशा प्रत्येक कामासाठी ग्रामसमितीने विविध कार्यकारी समिती नेमून त्यांमार्फत सर्व योजना राबवल्या पाहिजेत. प्रत्यक्ष शेती व वाडीव्यवस्था कुटुंबपातळीवर असली तरी सामाईक निसर्ग संपत्तीचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने सामूहिक पातळीवरील नियोजनाला कळीचे महत्तव आहे. मोकाट चराई बंदी, बंधाऱ्यांची दुरुस्ती-देखभाल, समन्यायी पाणीवाटप हे सर्व निर्णय गावपातळीवर एकत्रित होणे अगत्याचे आहे. प्रक्रिया व इतर उद्योगांचे संघटन आणि गावातील मत्स्य, शेती व वन उत्पादने आणि औद्योगिक उत्पादने यांची खात्रीशीर व किफायतशीर विक्री यासाठी नागर ग्राहक-संस्थांशी परस्परपूरक संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. कोकणातील तरुण वर्गाने यासाठी लागणारे कसब, तंत्र कौशल्य व संघटनकौशलय मिळवून पुढाकार घेणे महत्तवाचे आहे. मुंबईला असलेली कोकण ग्रामविकास मंडळे मुख्यत... देवळे, शाळा, रस्ते इ. विकासाची कामे हाती घेतात. त्यांनी हरितीकरण, कृषी-प्रक्रिया उद्योग व विक्री-व्यवस्था यासाठी मदत केली तर कोकणच्या खेडयांचा कायापालट साधता येईल आणि पोटासाठी कोकण सोडण्याची वेळ तरुण-तरुणींवर येणार नाही.

यासाठी थोडी दूरदृष्टी ठेवून विकासाला सुयोग्य दिशा देण्याची जबाबदारी कोकणच्या तरुण-तरुणीने घेणे आवश्यक आहे. आज झटपट पैसा कमावण्याचे विविध मार्ग तरुणांसमोर येत आहेत. कोकण रेल्वेमुळे जमीनीचे भाव एकदम वाढले आहेत आणि जमीन विक्री व्यवहारात मोठा पैसा दिसतो आहे. मोठया उद्योगांसाठी कंत्राटे, मध्यस्तगिरी यामध्ये व्यापारी, मध्यस्तांना मोठया फायद्याची संधी दिसते आहे. लगोलगचा व्यक्तिगत फायदा, न्यूनगंड, भयगंड यापोटी कोकणातील जमिनीची विक्री चालू आहे.

जमीन आज जरी उत्पन्न देत नसली तरी भविष्यातील उत्पादनक्षमता लक्षात घेऊन जमीन हाती राखणे

गरजेचे आहे. लगोलग पैसा मिळवण्याच्या जाळ्यात न अडकता जमीन-आपला जीवनाधार सांभाळून ठेवणे महत्वाचे आहे. एकदा जमिनीची विक्री झाली तर कोकणची हिरवीगार भूमी उदध्वस्त करून उभे राहणारे कारखाने, औष्णिक वीजनिर्मिती केंद्रे आणि कोकणचे निळेशार समुद्रकिनारे ताब्यात घेणारी पंचतारांकित हॉटेल यांच्या सेवा-चाकरीत घरगडी, मोलकरीण, झाडूवाले व हमाल अशा व वेठबिगारीच्या कामात कोकणचा श्रमिक लोटला जाईल किंवा काळ्या धंद्यात गुरफटला जाईल. कोकणचे जनजीवन प्रदूषण, रोगराई, व्यसनाधीनता, लाचारी याने झपाटले जाईल. आपली भूमी व अस्मिता गमावण्याचा, दुय्यम नागरिक बनवले जाण्याचा धोका कोकणचा श्रमिक शेतकरी, मच्छीमार, कारागीर यांना जाणवतो आहे. आणि म्हणूनच शासकीय विकासाचा बुलडोझर अडवण्याचा प्रयत्न कोकणचा श्रमिक करतो आहे. स्वयंनिर्भर, स्वाभिमानी, समृध्द जीवन उभे करण्यासाठी खऱ्या विकासाची मागणी घेऊन संघटित होतो आहे. श्रमिकांच्या आंदोलनाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

समुचित विकासाची दिशा

१) कोकण हा महाराष्ट्राचा हरितपट्टा आहे, जैवविविधता टिकवण्यासाठी आणि पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने तो हरितपट्टा म्हणून राखला पाहिजे. या सुरक्षित राखीव क्षेत्रात चिरस्थाई पध्दतीची शेती, मत्स्यव्यवसाय, फळबागा, वनीकरण, कारागिरी उद्योग यांचाच विकास करण्यास पोषक असे संयोजन केले पाहिजे. कोकणचा शेतकरी, मच्छीमार, कारागीर यांचा सहभाग व समृध्दीच्या हेतूने या योजना आखल्या पाहिजेत. यामध्ये हरितीकरण, फलोद्यानविकास, पाणलोटक्षेत्र विकासयोजना, मत्स्यव्यवसाय विकास याला अग्रक्रम दिला पाहिजे.

२) कोकणाची विविध उत्पादने-लाकूड, बांबू, नारळ, काजू, आंबे व इतर फळे, औषधी वनस्पती, मासे याआधारे प्रक्रिया उद्योग व ग्राहक सहकारी संस्थाव्दारा वितरण व्यवस्थेची उभारणी केली पाहिजे.

३) फलोद्यान विकास योजना, पाणलोट विकास योजना, पश्चिम घाट विकास योजना याखालील निधी साचेबंद शासकीय योजनाव्दारा खर्ची न घालता ग्रामसमितीच्या पुढाकाराने बनवलेल्या एकात्मिक योजनांसाठी या निधीचा वापर करण्याची तरतूद केली पाहिजे.

४) कोकणामध्ये एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहती, आण्विक व औष्णिक वीज केंद्रे, रिफायनरी, रासायनिक उद्योग असे प्रदूषणकारी, मोठे उद्योग आणू नयेत. उद्योग, पर्यटन आदींसाठी सक्तीने जमीन हस्तगत करता कामा नये. बहुराष्ट्रीय/बडया कंपन्यांना खोल समुद्रात मच्छीमारीस परवाने देता कामा नये.

५) चालू असलेल्या उद्योगांमुळे होणाऱ्या पाणी व हवा प्रदूषणावर कडक नियंत्रणे घालून आजवर झालेल्या नुकसानीची भरपाई कारखान्यांकडून वसूल केली पाहिजे.

६) कोकणमधील किनारपट्टी व्यापारी अलिशान पर्यटनासाठी खुली करता कामा नये. व्यापारी पर्यटनामुळे कोकणचे समुद्रकिनारे प्रदूषित होतील, विलासी पर्यटनामुळे लैंगिक व्यापार बोकाळेल. अलिबागपासून मालवणपर्यंत जगातल्या प्रसिध्द किनाऱ्यांना लाजवतील असे किनारे व पुळणी कोकण किनाऱ्यावर आहेत. पैदल भटकंती, वनस्पती, कीटक, मत्स्य संपत्तीचा अभ्यास अशा खिलाडू व अभ्यासू पर्यटनासाठीस हा कोकणाचा नैसर्गिक ठेवा राखला पाहिजे. पंचतारांकित ओंगळ, भणंग, व्यसनी पर्यटनाला येथे थारा देऊ नये. गोव्यामधले समुद्रकिनारे भोगविलासी पर्यटकांना दिल्याने गोवेकर पोळले गेले आहेत. ते लोण कोकणमध्ये आणण्याचा राज्य सरकारचा मनसुबा आहे. हे अतिक्रमण वेळीच थोपवणे अगत्याचे आहे.

७) कोकणामधील मत्स्यव्यवसाय, फलोद्याने, वनव्यवसाय आधारित व्यापार व उद्योगाच्या सोयीच्या दृष्टीने बंदर व रस्ते विकास योजना आखून कालबध्द रितीने त्या पुऱ्या केल्या पाहिजेत. कोकणच्या बंदराचे खाजगीकरण करता कामा नये.

८) निर्यातीवर लक्ष केंद्रित न करता देशातील ग्राहक पेठांशी संबंध प्रस्थापित करून त्या दृष्टीने साठवणूक व वाहतूक व्यवस्था आणि स्थानिक बाजारपेठेतील गरजा भागवण्याच्या दृष्टीने वितरण व्यवस्था याचे संयोजन केले पाहिजे. चंगळवादी पर्यटन, घातक कारखाने आदींच्या वाढीकरता विमानतळ, बंदरे, महामार्ग योजना रद्द कराव्या.

९) गावोगावी पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा व शिक्षण सुविधा पोचवण्याची कालबध्द योजना आखली पाहिजे.

१०) कोकणच्या शास्त्रीय संयोजनासाठी शाळा-महाविद्यालयांच्या सहभागाने गावपातळीवर अभ्यास व योजना आखण्याचे काम व त्याबाबतचे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.

११)बडया बहुराष्ट्रीय व भारतीय कंपन्या कोकणमधील नैसर्गिक संपत्तीवर कबजा मिळवण्याच्या मागे आहेत. त्यांचा हा हल्ला देशभरच चालू आहे. भारतासारख्या उष्णकटिबंधातील देशातील सुपीक जमीन व पाण्यावर ताबा मिळवून त्याचा वापर फळे, फुले, मसाल्याच्या व सुंगधी वनस्पती आदी मोठी किफायतशीर पिके श्रीमतांचा चंगळवाद पोसण्यासाठी पैदा करायची आणि भारतातील भात, ज्वारी, गहू, कडधान्ये, तेलबिया आदी जीवनावश्यक अन्नधान्याचे उत्पादन घटवायचे असा त्यांचा प्रयत्न आहे. भारताची अन्नधान्याची स्वयंनिर्भरता अशी नष्ट करून अमेरिकेतील जादा गहू, सोयाबीन आदी खपवण्यासाठी भारताची बाजारपेठ ताब्यात घ्यायची आणि भारताला पूर्णपणे अमेरिकाबलंबी बनवायचे, या त्यांच्या कारस्थानामध्ये भारतीय राज्यकर्ते सामील आहेत व त्यासाठी जागतिकीकरण-खाजगीकरणाचे धोरण रेटत आहेत. परिणामी अन्नधान्यांची स्वंयपूर्णता नष्ट होऊन भारतीय जनता

भयानक अरिष्टात सापडण्याचा धोका आहे. या देशविकाऊ धोरणाविरोधात व लोककेंद्री स्वयंनिर्भर विकासासाठी देशभरची जनता लढते आहे. तेव्हा कोकणमधील कोकण बचावासाठीच्या आंदोलनाचे एकसंधीकरण करून अखिल महाराष्ट्रातील सेझविरोधी, डाऊविरोधी आंदोलनांशीही समन्वय साधून सत्ताधारी वर्गाचे देश विकण्याचे कारस्थान उधळून लावलेच पाहिजे आणि लोककेंद्री समुचित विकासासाठी संघटितरित्या ़झटले पाहिजे.

***